सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २७२ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. १ डिसेंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## पराभवाच्या चर्चेने विरोधक संतप्त

### नरेंद्र मोदींना पंतप्रधानपदाच्या प्रतिष्ठेची करून दिली आठवण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१नवी दिल्ली**

हिवाळी अधिवेशनापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विरोधकांवर निशाणा साधला. मोदी यांनी केलेल्या विधानावरून संसदेच्या हिवाळी अधिवेशनात संसदेबाहेर गोंधळ उडाला. बिहार निवडणूक निकालांचा संदर्भ देताना मोदी यांनी पराभवाच्या निराशेबद्दल व्यंग्यात्मक टिप्पणीही केली. पंतप्रधान मोदी म्हणाले, मी सर्वांना आवाहन करतो की पराभवाच्या निराशेतून बाहेर पडा आणि संसदेचे कामकाज चालू ठेवा. विरोधकांनी पराभवाच्या निराशेतून बाहेर पडावे आणि संसदेत चर्चा करावी आणि महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा करावी. दरम्यान, आता विरोधी पक्ष आक्रमक झाला आहे.

राजदचे राज्यसभेचे खासदार मनोज झा यांनी पंतप्रधान मोदी स्वतः कोणत्या



निराशेत आहेत असा प्रश्न उपस्थित केला. जर पंतप्रधान म्हणाले असतील की विरोधी पक्ष पराभवामुळे निराश झाला आहे, तर ते कोणत्या निराशेत आहेत? तुमचे काय निराशेचे आहे? मूलभूत मुद्द्यांवर निवडणूक लढवण्याऐवजी तुम्ही कट्टा, म्हशी आणि मुजरा यासारख्या गोष्टींबद्दल बोलत आहात. ही पंतप्रधानांची प्रतिष्ठा आहे का?, असा सवालही त्यांनी केला.

काँग्रेस खासदार प्रियांका गांधी वाड्रा यांनीही पंतप्रधान मोदींना प्रत्युत्तर दिले. सार्वजनिक मुद्दे मांडणे नाटक बनले की काय असा प्रश्न त्यांनी विचारला. अनेक गंभीर मुद्दे आहेत. निवडणूक परिस्थिती, एसआयआर आणि प्रदूषण हे प्रमुख मुद्दे आहेत. या मुद्द्यांवर चर्चा झाली पाहिजे. शेवटी, संसद त्यासाठीच आहे. मुद्दे मांडणे म्हणजे नाटक नाही. नाटक म्हणजे त्यांना त्यावर चर्चा करण्याची परवानगी नाही. लोकशाहीच्या मर्यादेत सार्वजनिक मुद्दे मांडणे म्हणजे नाटक नाही, असंही गांधी म्हणाल्या.काँग्रेस खासदार रेणुका चौधरी यांनीही प्रत्युत्तर दिले.आम्हाला हे कोण समजावून सांगत आहे? महान नाट्यमालक. आपण त्यांच्याकडून कसे आणि केव्हा वागायचे हे शिकले पाहिजे. आपल्याला कसे वागायचे हे माहित नाही. कपडे बदलून आणि कॅमेरा अँगल बदलून कसे वागायचे हे शिकले पाहिजे. असे दिसते की विश्वगुरू आता मानसिक गुरुही बनले आहेत, असा टोलाही त्यांनी लगावला.

## माझे मंत्रिमंडळ 'फुल्ल', आता 'व्हॅकन्सी' नाही

### जयंत पाटील यांचे नाव न घेता मुख्यमंत्र्यांचा टोला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१ईश्वरपूर :**

राज्यातील पालिकेच्या निवडणुकीच्या माध्यमातून आपल्या सभा होत असतात, अशा सभेतून आपण कोणावरही टीकाटिप्पणी करत नाही; परंतु माझ्या मंत्रिमंडळात एकही व्हॅकन्सी नाही, असा टोला आमदार जयंत पाटील यांचे नाव न घेता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लगावला, तसेच भाजपमध्येही कुणालाच प्रवेश दिला जाणार नसल्यामुळे सांगली जिल्ह्यातील भाजप नेत्यांनी चिंता करण्याची गरज नाही, असेही ते म्हणाले.

येथील गांधी चौकात



उरुण ईश्वरपूर नगरपालिकेच्या निवडणुकीतील महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ सभा झाली. यावेळी पालकमंत्री चंद्रकांत पाटील, माजी मंत्री अण्णासाहेब डांगे, आमदार सुधीर गाडगीळ, सुरेश खाडे, सदाभाऊ खोत, सत्यजित देशमुख, नीता केळकर, जयश्री पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

फडणवीस म्हणाले, महायुतीमधील सर्व घटक पक्ष हे विकासाच्या मुद्द्यावर एकत्र आले आहेत. जनतेच्या विकासात कुणीही अडथळा न आणता कामाला गती देण्याची गरज आहे. आता शहरांच्या विकासाकडे लक्ष दिले जाणार आहे. शहरातील जनतेचे जीवनमान बदलण्याचे प्रयत्न सुरू आहेत. शहरे बकाल होणार नाहीत, यासाठी केंद्र सरकारच्या माध्यमातून अनेक योजना राबवत आहोत. ते म्हणाले, जात, धर्म, पंथ न पाहता समाजातील सर्व घटकांच्या परिवर्तनासाठी हे सरकार काम करत आहे. भारताच्या तिरंगा ध्वजाचा जो मान ठेवतो त्याचे उत्थान करणे हे आमचे कर्तव्य असल्याचे हि ते यावेळी म्हणाले.

## निवडणुका लांबणीवर टाकण्याचा निर्णय चुकीचा

### मुख्यमंत्र्यांची निवडणुक आयोगावर आगपाखड; शिंदेंची भेट टाळली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१छत्रपती संभाजीनगर**

राज्य निडवणूक आयोगाचा निवडणुका लांबणीवर टाकण्याचा निर्णय अतिशय चुकीचा असल्याचा संताप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी सकाळी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केला. निवडणूक आयोगाने कायद्याचा चुकीचा अर्थ लावला. आयोग कोणता कायदा काढतंय किंवा तो कुणाचा सल्ला घेत आहे याची मला कल्पना नाही. पण एखादा व्यक्ती कोर्टात गेला म्हणून निवडणूकच पुढे ढकलायची हे अतिशय चुकीचे आहे, असे ते म्हणालेत. दरम्यान, मुख्यमंत्र्यांनी आज एकनाथ शिंदे यांची भेट टाळली. तसेच शिंदे गटाचे आमदार शहाजी बापू पाटील यांच्यावर झालेल्या छापेमारीवरही भाष्य केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या निमित्ताने आज छत्रपती संभाजीनगरच्या दौऱ्यावर आहेत. त्यांनी प्रचारसभेला जाण्यापूर्वी पत्रकारांशी संवाद साधला. त्यात त्यांनी निवडणुका लांबणीवर टाकण्याच्या निर्णयावरून निवडणूक आयोगावर निशाणा साधला. ते म्हणाले, माझ्या मते निवडणूक आयोगाने कायद्याचा चुकीचा अर्थ लावला आहे. या निवडणुका रद्द करणे हे अत्यंत चुकीचे आहे. अशा पद्धतीने तर प्रत्येकवेळी कुणीही कोर्टात जाईल आणि मग निवडणुका पोस्टपॉंड होतील. असे आजवर कधीच झाले नाही.

**आयोग कुणाचा सल्ला घेत आहे याची कल्पना नाही**

फडणवीस म्हणाले, निवडणूक आयोग कुठला कायदा काढतंय किंवा आयोग कुणाचा सल्ला घेत आहे याची मला कल्पना नाही. पण मी जो कायदा पाहिला, जेवढा माझा अभ्यास आहे, मी अनेक वकिलांशीही बोललो, या सर्वांचे मत आहे की, अशा पद्धतीने या निवडणुका एखादा व्यक्ती कोर्टात गेला म्हणून पुढे ढकलता येत नाहीत. हे अतिशय चुकीचे आहे. पण निवडणूक आयोग स्वायत्त आहे. त्यांना निवडणूक घेण्याचा अधिकार आहे. पण माझे मत आहे की, निवडणूक आयोगाने निवडणुका लांबणीवर टाकलेला निर्णय अतिशय चुकीचा आहे. प्रामाणिकपणे निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांवर झालेला हा अन्याय आहे. उद्या निवडणूक आहे आणि आज



तुम्ही ती लांबणीवर टाकता, यामुळे त्यांचे श्रम व मेहनत वाया गेली. आता १५ - २० दिवस त्यांनी पुन्हा प्रचार करायचा. सरकार या प्रकरणी निवडणूक आयोगापुढे सादरीकरण करून हा निर्णय चुकीचा आहे हे सांगेन, असे ते म्हणाले.

**एकनाथ शिंदेंच्या भेटीवर काय म्हणाले?**

मुख्यमंत्री फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज दोघेही छत्रपती संभाजीनगरच्या दौऱ्यावर आहेत. पण तिथेही या दोन्ही नेत्यांची भेट झाली नाही. पत्रकारांनी याविषयी फडणवीसांना छेडले असता मी रात्री लवकर आलो व सकाळी लवकर जात असल्यामुळे आमची भेट झाली नसल्याचे स्पष्ट केले. माध्यमांना आता दिवसभरासाठी खाद्य मिळाले आहे. पण मी रात्री उशिरा आलो. आज सकाळी १ तास लवकर जात आहे. कारण, मी माहिती घेतली त्यांची सभा माझ्या सभेनंतर १ तास नंतर आहे. त्यामुळे भेट झाली नाही. उद्या होईल, त्याला काय? शेवटी आम्ही दोघेही प्रचारात मग्न आहोत.

आमचे फोनवर रोजच बोलणे होते. त्यामुळे आता भेट झाली किंवा न झाली हा विषय नाही. ते अजून तयार व्हायचेत. मला लवकर निघायचे आहेत. कारण माझ्या सभा लवकर ठेवल्यात. यात कोणती मोठी गोष्ट आहे. तुम्ही चालवा दिवसभर झाली नाही भेट म्हणून, असे फडणवीस हसत म्हणाले.

## शहाजी बापूंवरील छापेमारी गंभीर विषय नाही : उपमुख्यमंत्री शिंदेंची स्पष्टोक्ती

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१मुंबई**

सांगोल्याचे माजी आमदार शहाजी बापू पाटील यांच्या कार्यालयावर डउइ ने केलेली छापेमारी गंभीरपणे घेण्याचा विषय नाही, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी पत्रकारांशी बोलताना स्पष्ट केले. यावेळी त्यांनी एकाच हॉटेलमध्ये थांबूनही मुख्यमंत्र्यांची भेट झाली नसल्याच्या प्रश्नाला उत्तर दिले. तसेच मुख्यमंत्र्यांसोबत आपले कोणतेही मतभेद नसल्याचेही निक्षुण सांगिले. मी व मुख्यमंत्र्यांनी कधी एकमेकांवर आरोप - प्रत्यारोप केलेत का? नाही. मग ही स्थानिक पातळीवरील निवडणूक असून, तिचेही प्रश्नही वेगळे आहेत, असे ते म्हणालेत.

सत्ताधारी शिवसेनेचे सर्वेसर्वा एकनाथ शिंदे आज छत्रपती संभाजीनगरच्या दौऱ्यावर आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसही आज जिल्ह्यात आहेत. हे दोन्ही नेते शहरातील एका



हॉटेलमध्ये मुक्कामाला थांबले होते. पण त्यांनी एकमेकांची भेट घेतली नाही. त्यामुळे या दोन्ही नेत्यांत असणारे कथित मतभेद टोकाला भिडल्याची चर्चा माध्यमांत सुरू झाली होती. पण सकाळी फडणवीस व त्यानंतर काही वेळातच एकनाथ शिंदे यांनी आपल्यात कोणतेही मतभेद नसल्याचे स्पष्ट केले. तसेच व्यस्त वेळापत्रकामुळे एकमेकांची भेट झाली नसल्याचेही त्यांनी जोर देऊन सांगितले.

## शरद पवार यांना का सोडले? सलील देशमुखांनी मौन सोडले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१नागपूर**

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे नेते अनिल देशमुख यांचे पुत्र सलील देशमुख यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचा राजीनामा दिला. व्यक्तिगत कारणावरून राजीनामा दिल्याचे सलील देशमुख यांनी सांगितले. त्यांच्या पक्ष सोडण्याच्या निर्णयामागे त्यांचे वडिलांसोबत (अनिल देशमुख) झालेले मतभेद कारणीभूत आहेत, अशी चर्चा आहे, काटोल पालिका निवडणुकीत शेकापचे नेते राहुल देशमुख यांच्यासोबत युती केल्याने सलील यांनी टोकाचा निर्णय घेतला अशी चर्चा आहे. देशमुख यांनी यापैकी कोणतेही स्पष्टीकरण दिले नाही. प्रकृतीच्या कारणावरूनच राजीनामा दिला असे ते सांगत होते. मात्र अलीकडेच एका वृत्त वाहिनीशी बोलताना शरद पवार यांचा पक्ष का सोडला याची सविस्तर कारणे सांगितली, त्यात वडिलांशी मतभेदांसह शेकापसोबत केलेल्या युतीचाही संदर्भ होता.

शरद पवार यांची राष्ट्रवादी का



सोडली, असा थेट प्रश्न सलील देशमुख यांना विचारला असता त्यांनी प्रकृती अस्वस्थाचे कारण दिले. वडिलांसोबत काही मतभेद आहेत का ? या दुसऱ्या थेट प्रश्नावर त्यांनी उत्तर दिले नाही, मात्र राजकारणात काम करीत असताना अनेक वर्षापासून सोबत काम करणाऱ्यांना संधी देता आली नाही याची खंत वाटते, असे सांगितले.


शेकापचे नेते राहुल देशमुख यांच्यासोबत पालिका निवडणुकीत युती केली म्हणून नाराज आहात का ? या तिसऱ्या थेट प्रश्नावर सलील यांनी थेट उत्तर दिले नसले तरी राहुल देशमुख यांचे नाव न घेता त्यांच्यावर त्यांनी अप्रत्यक्ष टीका केली. ते म्हणाले ज्यांचे अस्त्वत्व नाही, त्यांच नाव घेऊन मी वेळ वाया घालवू इच्छित नाही, जे पैसे देऊन भाषणे करतात, जे भाजपची बी टीम म्हणून काम करते, त्यांच्या विषयी मी बोलणार नाही, राहिला प्रश्न काटोल नगर पालिका निवडणुकीचा तर आठ वर्षापासून कार्यकर्ते या निवडणुकीची वाट बघत होते. त्यांना उमेदवारी देऊ शकलो नाही, त्यामुळे नाराजी असणारच.

## भारतीयांना भारतीय भाषाच येत नाहीत, सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांच्याकडून चिंता व्यक्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१नागपूर मेल**

भारतीय भाषाच भारतीय लोकांना येत नाहीत. पूर्वीची व्यवहार भाषा संस्कृत होती. मात्र, आज संस्कृत शिकवायला अमेरिकेतील प्राध्यापक येतात. मुळात आपण त्यांना जे शिकवायला हवे ते आपल्याला शिकवतात. त्यामुळे आपल्या येणाऱ्या पिढीलाही आपल्या भाषा कोण शिकवणार?, अशी चिंता सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी व्यक्त केली.

राज्यात त्रिभाषा सूत्र लागू करण्यासाठी राज्य सरकार आग्रही असताना डॉ. भागवत यांचे विधान महत्त्वाचे मानले जात आहे. 'ज्ञानेश्वरी'च्या इंग्रजी भाषांतरित ग्रंथाचे प्रकाशन सरसंघचालक यांच्या हस्ते



करण्यात आले. कार्यक्रमाला डॉ. तुकाराम गरुड उपस्थित होते. नागपूरच्या सायंटिफिक सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात भागवत यांनी मराठी भाषा शिकवण्याचा आग्रहही धरला.

समाजाला भाषिक वारशाच्या ऱ्हासावर आत्मपरीक्षण करण्याचे आवाहन करता डॉ. भागवत म्हणाले की, एक काळ असा होता जेव्हा संपूर्ण संवाद, देवाणघेवाण आणि दैनंदिन व्यवहार संस्कृतमध्ये होत होते. आज अनेक मुलांना काही मूलभूत आणि सोपे शब्द माहीत नाहीत. बहुतेकदा घरी मातृभाषेतून बोलतानाही त्यात इंग्रजी भाषेचे मिश्रण असते. इंग्रजी माध्यमाचे शिक्षण घेण्याला विरोध नाही. परंतु, घरी भारतीय भाषा बोलण्यास नकार देणे ही परिस्थिती आणखी वाईट आहे. जर आपण आपल्या घरात आपली भाषा योग्यरित्या बोललो तर त्यात भाव व्यक्त करता येतात. पण आपण ते करत नाही, अशी चिंताही भागवत यांनी व्यक्त केली.

## पाकिस्तानसाठी हेरगिरी करणाऱ्या निशांत अग्रवालला तीन वर्षे कारावासाची शिक्षा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१नागपूर**

पाकिस्तानसाठी हेरगिरी करून भारताची सुरक्षा, सार्वभौमत्व व अखंडता धोक्यात टाकणारा ब्रह्मोस एयरोस्पेस कंपनीचा देशद्रोही अभियंता निशांत प्रदीपकुमार अग्रवाल (२८) याला मुंबई उच्च न्यायालयाच्यानागपूर खंडपीठाने सोमवारी तीन वर्षे कारावासाची सुधारित शिक्षा सुनावली. न्यायमूर्तीद्वय अनिल किलोर व प्रवीण पाटील यांनी हा निर्णय दिला.

निशांत नेहरूनगर, रुडकी, जि. हरिद्वार (उत्तराखंड) येथील मुळ रहिवासी असून तो भारत व रशियाचा संयुक्त उपक्रम असलेल्या ब्रह्मोस एयरोस्पेस कंपनीच्या नागपूरातील प्रकल्पामध्ये सिस्टिम इंजिनियर पदावर कार्यरत होता आणि उज्ज्वलनगर येथे भाड्याच्या घरात राहत होता. सत्र न्यायालयाने त्याला ३ जून २०२४ रोजी माहिती तंत्रज्ञान कायद्यातील कलम ६६-एफ अंतर्गत जन्मठेप, शासकीय गुपिते कायद्यातील कलम ३(१)(सी) अंतर्गत १४ वर्षे सश्रम कारावास तर, कलम ५(१)(ए)(बी)(सी)(डी) आणि कलम ५(३) अंतर्गत तीन वर्षे सश्रम कारावास व तीन हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावली होती. त्या निर्णयाविरुद्ध अग्रवालने उच्च न्यायालयात अपील दाखल केले होते. त्यात हा निर्णय देण्यात आला. सरकारच्या वतीने ड. संजय डोईफोडे व ड. अनुप बदर तर, अग्रवालतर्फे वरिष्ठ ड. सुनील मनोहर यांनी बाजू मांडली.

## संपादकीय ......

# आधी कारभारी, मग टक्केवारी

महाराष्ट्रातल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत सुरू असलेला आरक्षण मर्यादेचा घोळ अद्याप मिटलेला नाही. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी दिलेल्या निकालामुळे राज्य सरकार, निवडणूक आयोग आणि निवडणूक लढवणार्या सर्वच उमेदवारांना मोठा दिलासा मिळाला आहे. जेव्हापासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ५० टक्के कमाल मर्यादेचे उल्लंघन झाल्याची याचिका दाखल झाली आहे, तेव्हापासून या निवडणुकांवर टांगती तलवार होती. सर्वोच्च न्यायालय या निवडणुका रद्द करणार, तात्पुरती स्थगिती देणार की निवडणुकांचा कार्यक्रम पुढे ढकलणार असे एक ना अनेक प्रश्न या याचिकेमुळे निर्माण झाले होते. त्यावर घेतलेल्या सुनावणीनंतर सर्वोच्च न्यायालयाने सध्या प्रक्रिया सुरू असलेल्या नगरपरिषद व नगरपंचायतींच्या निवडणुकांचा मार्ग मोकळा केला आहे. २८८ पैकी केवळ ५७ नगरपरिषदा व नगरपंचायतींमध्ये आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांच्या वर गेली आहे, अशा ठिकाणचे निकाल जानेवारीत होणार्या सुनावणीतील अंतिम निकालांवर अवलंबून असतील, अशी एक महत्त्वाची अट सर्वोच्च न्यायालयाने घातली आहे. त्यामुळे राज्य निवडणूक आयोगाने आखलेल्या नियोजित कार्यक्रमानुसार येत्या २ डिसेंबर रोजी या निवडणुकांसाठी मतदान होईल.

याचिकाकर्त्यांनी सर्वोच्च न्यायालयात केलेल्या दाव्यानुसार २४२ पैकी ४० नगरपरिषदांमध्ये, ४६ पैकी १७ नगरपंचायतींमध्ये, ३२ पैकी १७ जिल्हा परिषदांमध्ये, ३३६ पैकी ८३ पंचायत समित्यांमध्ये आणि २९ पैकी २ महापालिका क्षेत्रात ५० टक्के आरक्षण मर्यादेचे उल्लंघन झाले आहे. यातील ५७ नगरपरिषदा व नगरपंचायतींचे भवितव्य अंतिम निकालावर ठरणार आहे, म्हणजे या निवडणुकांचा प्रश्नही आता बाजूला पडलेला आहे. त्यामुळे राज्य निवडणूक आयोग उर्वरित निवडणुकीची घोषणा करण्यासाठी मोकळे झाले आहे. मात्र, या निवडणुकांची घोषणा करताना निवडणूक आयोगाला ज्या ज्या ठिकाणी ५० टक्क्यांच्या मर्यादेचे उल्लंघन झाले आहे, केवळ अशाच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये पुन्हा एकदा आरक्षणाची बेरीज-वजाबाकी करून सोडती काढाव्या लागतील. तर, ज्या ठिकाणी आरक्षण मर्यादेचे उल्लंघन झाले नाही अशा १७ जिल्हा परिषदा, २५३ पंचायत समित्या आणि २७ महापालिकांच्या निवडणुका घ्यायला काहीच अडचण येणार नाही. एकूणच काय तर जिथे जिथे प्रशासकीय बाबूंनी आकडेवारीत गडबड केली आहे, ती गडबड त्यांना सुधारावी लागेल. त्यासाठी हवे असल्यास एखाद दोन आठवड्याचा अधिकचा वेळ त्यांनी घेतला तरी काही हरकत नाही, परंतु सर्व आकडेमोड करूनच आता निवडणुका व्हायला हव्यात. नव्याने घोषित होणार्या कुठल्याही निवडणुकीत आरक्षण मर्यादेचे उल्लंघन नको, असा दट्टचा आधीच सर्वोच्च न्यायालयाने दिलेला आहे. हे आदेश नगरविकास, ग्रामविकास खात्याला पाळावेच लागतील, अन्यथा जानेवारीत होणार्या सुनावणीत खैर नसेल. ज्या बांठिया कमिशनच्या अहवालावरून हा सगळा घोळ सुरू झाला, त्या बांठिया अहवालावरही न्यायालयात काथ्याकूट झाला. राज्यात शैक्षणिक व शासकीय नोकरीत इतर मागासवर्गीयांचे (ओबीसी) आरक्षण स्पष्ट असले तरी राजकीय आरक्षणात स्पष्टता नसल्याने हे आरक्षण ठरवण्यासाठी तत्कालीन महाविकास आघाडी सरकारने बांठिया कमिशनची स्थापना केली होती. परंतु हा अहवाल येण्याआधीच मविआ सरकार कोसळले आणि बांठिया कमिशनने आपला अहवाल तत्कालीन शिंदे सरकारच्या हाती सुपूर्द केला.

या अहवालात राज्यामध्ये ओबीसींची एकूण संख्या ३७ टक्के असली, तरी जिल्हानिहाय कमी-अधिक बॅकलॉगनुसार त्यांना २७ टक्क्यांपर्यंत राजकीय आरक्षण मिळावे, परंतु हे आरक्षण देताना ५० टक्के कमाल आरक्षणाची मर्यादा ओलांडता कामा नये, असे बांठिया कमिशनने आपल्या अहवालात नमूद केले आहे. या अहवालाला न्यायालयात आव्हान देण्यात आल्याने अद्याप हा अहवालच मुळात लागू झालेला नाही. त्यातही महत्त्वाचे म्हणजे या अहवालाची कायदेशीरता अजूनही सर्वोच्च न्यायालयात सिद्ध व्हायची आहे. असे असूनही राज्य सरकारने या अहवालाच्या आधारे ओबीसींना सरसकट २७ टक्के आरक्षण देण्याचा घेतलेला निर्णय पूर्णत: अनाकलनीय ठरतो. देशात शेवटची जनगणना २०११ साली झाली होती. त्याला जवळपास दीड दशक होत आले. या दीड दशकात ओबीसींसकट इतर जाती-समूहांच्या लोकसंख्येत कमालीची वाढ अथवा घट झालेली असणार. आरक्षण देताना खुद्द सर्वोच्च न्यायालयानेच ट्रिपल टेस्टचे फ्रेमवर्क आखून दिलेले आहे. लोकसंख्येचे असे कुठलेही ताजे आकडे हाती नसताना आरक्षण सोडती काढणेच हवेत तीर मारण्यासारखे आहे. त्यातूनच ओबींना सरसकट दिलेल्या आरक्षणामुळे हा घोळ निर्माण झालेला आहे. खरेतर आज ज्या बांठिया अहवालावर ऐन निवडणुकीच्या तोंडावर इतकी चर्चा होत आहे, त्यावर मागच्या ३ वर्षांत राजकीय दरबारी किंवा किमान सर्वोच्च न्यायालयात काहीतरी निर्णय व्हायला हवा होता. हे म्हणजे वरातीमागून घोडे आणण्यासारखे झाले. मागच्या ५ वर्षांहून जास्त काळापासून स्थानिक पातळीवर निवडणुका झालेल्या नाहीत. सर्वच ठिकाणी प्रशासकराज असून प्रचंड भ्रष्टाचार, अनागोंदीचा कारभार सुरू आहे. लोकप्रतिनिधी नसल्याने सर्वसामान्यांना आपले प्रश्न घेऊन जायचे कुणाकडे असा प्रश्न पडला आहे. त्यामुळे तूर्तास बांठिया कमिशनने दिलेल्या अहवालाच्या टक्केवारीत न पडता राज्य सरकार आणि निवडणूक आयोगाने ५० टक्क्यांची कमाल मर्यादा पाळून नव्याने आरक्षण सोडती काढव्यात व निवडणुका सुरळीत पार पाडाव्यात. आधी स्थानिक जनतेला कारभारी मिळू द्या, टक्केवारीचा निर्णय सर्वोच्च न्यायालय देईलच.

# बागायती गव्हाची पेरणी कधीपर्यंत करता येईल, कुठले वाण निवडावे




**दि.१ विदर्भ प्रजासत्ताक**

गायत गव्हाच्या उशिरा पेरणीची शिफारस ही १६ नोव्हेंबर ते १५ डिसेंबर या कालावधीसाठी आहे. मात्र, काही ठिकाणी १५ डिसेंबरनंतरही गव्हाची पेरणी केली जाते.

वास्तविक १५ नोव्हेंबरनंतर पेरणी केलेल्या प्रत्येक उशिराच्या पंधरवड्यात गव्हाची पेरणी केल्याने एकरी १ क्विंटल उत्पादन कमी मिळते.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

कुठले वाण निवडावे : गव्हाच्या बागायती उशिरा पेरणीसाठी एनआयएडब्लू-३४, एकेएडब्लू-४६२७, फुले समाधान (एनआयएडब्लू-१९९४) या जातींची निवड करावी. एकरी ५० ते ६० किलो बियाणे वापरावे.

पेरणीपूर्वी प्रति किलो बियाण्यास ३ ग्रॅम कॅप्टन किंवा थायरमची प्रक्रिया करावी. त्यानंतर १५ मिनिटांनी प्रति दहा किलो बियाण्यास २५० ग्रॅम ॲझोटोबॅक्टर आणि २५० ग्रॅम पीएसबी जिवाणू संवर्धकाची प्रक्रिया करावी.

पेरणी कशी करावी : बागायती उशिरा पेरणीसाठी दोन ओळीत १८ सेंमी अंतर ठेऊन रासायनिक खतांच्या पहिल्या हप्त्यासह दोन चाडय़ाच्या पाभरीने पेरणी करावी. पेरणी ५ ते ६ सेंमी खोल करावी. त्यामुळे उगवण चांगली होते.

पेरणी दक्षिणोत्तर करावी. गव्हाची पेरणी उभी-आडवी न करता, एकेरी करावी.

म्हणजे आंतरमशागत करणे सोपे जाते. बियाणे झाकण्यासाठी कुळव उलटा करून चालवावा, म्हणजे बी व्यवस्थित दबून झाकले जाते. जमिनीचा उतार लक्षात घेऊन गव्हासाठी २.५ ते ४ मीटर रुंद आणि ७ ते २५ मीटर लांब आकाराचे सारे पाडावेत. पेरणीपूर्वी प्रति किलो बियाण्यास ३ ग्रॅम कॅप्टन किंवा थायरमची प्रक्रिया करावी. त्यानंतर १५ मिनिटांनी प्रति दहा किलो बियाण्यास २५० ग्रॅम ॲझोटोबॅक्टर आणि २५० ग्रॅम पीएसबी जिवाणू संवर्धकाची प्रक्रिया करावी.

**- ग्रामीण कृषी मौसम सेवा आणि विभागीय संशोधन केंद्र, इगतपुरी**




# थंडीत शरीर उबदार ठेवण्यासाठी करा 'हे' व्यायाम

**दि.१विदर्भ प्रजासत्ताक**

हिवाळ्याच्या दिवसांत थंडीमुळे सकाळी सकाळी उठून बाहेर पडणं आणि व्यायाम करणं कठीण होतं. पण कंटाळा न करता या दिवसांत शरीर उबदार ठेवण्यासाठी हलका व्यायाम करणं गरजेचं आहे.



या दिवसांत संसर्गाचे आजार होण्याचा धोका असतो, त्यामुळे काही व्यायाम केल्याने तुमची रोगप्रतिकारकशक्तीही मजबूत होते. तसेच दिवसभर उर्जेसाठी सकाळचा व्यायाम महत्त्वाचा असतो. हे असे व्यायाम आहेत जे कोणत्याही वयोगटातील लोक करू शकतात आणि त्यासाठी विशेष उपकरणांचीही गरज नसते.

हिवाळ्यात चालणं हा सर्वात प्रभावी व्यायाम मानला जातो. यामुळे रक्ताभिसरण वाढते आणि शरीर उबदार राहते. तसेच चालणं हे हृदयाच्या आरोग्यासाठीही फायदेशीर असतं. रोज सकाळी कोवळ्या उन्हात १५-२० मिनिटे जलद चालल्याने वजन नियंत्रित राहण्यास मदत होते आणि श्वासोच्छवास आणि फुफ्फुसांची क्षमता सुधारते. याशिवाय थंडीत सूर्यप्रकाश कमी असतो, त्यामुळे सकाळी कोवळ्या उन्हात चालल्याने शरीराला व्हिटॅमिन डी देखील मिळते.

तसेच सूर्यनमस्कार हा एक संपूर्ण व्यायाम मानला जातो, ज्यामुळे शरीर आणि मन दोन्ही सक्रिय राहते. या दिवसांत शरीराची लवचिकता वाढवण्यासाठी, संसर्गापासून बचावासाठी आणि रक्त उबदार ठेवण्यासाठी सूर्यनमस्कार करावे. दररोज सूर्यनमस्काराच्या ३-५ फेऱ्या करावे. यामुळे स्ट्रेसही कमी होतो.

# भाजपचा नगरपालिका निवडणुकीत १७५ नगराध्यक्ष निवडून येण्याचा अंदाज

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३१अमरावती-** राज्यातील २४६ नगरपालिका आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकांची रणधुमाळी आता अंतिम टप्प्यात आली आहे. प्रचार तोफा थंडावण्यास अवघे दोन दिवस उरले असतानाच भाजपने आपल्या अंतर्गत सर्वेक्षणाचे आकडे समोर आणत विरोधकांचे धाबे दणाणून सोडले आहेत. भाजपच्या अंतर्गत सर्व्हेनुसार, राज्यात पक्षाचे तब्बल १७५ नगराध्यक्ष विजयी होणार असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निकालात भाजपच 'मोठा भाऊ' ठरणार, असा विश्वास पक्षश्रेष्ठींकडून व्यक्त केला जात आहे.येत्या नगर परिषद आणि नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी २ डिसेंबरला मतदान प्रक्रिया पार पडणार असून, ३ डिसेंबरला निकाल लागणार आहे. या पार्श्वभूमीवर भाजपने प्रचारात मोठी आघाडी घेतली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि रवींद्र चव्हाण यांनी राज्यभरात झंझावाती प्रचार



दौरे केले आहेत.राज्यात नगराध्यक्षपदासाठी २४२ ठिकाणी भाजपचे उमेदवार थेट 'कमळ' चिन्हावर लढत आहेत, तर ४६ ठिकाणी महायुतीचे उमेदवार रिंगणात आहेत. सर्वाधिक जागांवर उमेदवार असल्याने आणि प्रचारातील प्रतिसादावरून भाजपला १७५ हून अधिक नगराध्यक्षपदे मिळण्याचा अंदाज सर्वेक्षणात वर्तवण्यात आला आहे.

**भाजपचा विकासाच्या मुद्द्यावर भर-** भाजपने या निवडणुकीत विकासाचा अजेंडा राबवला आहे. मतदारांना केंद्रातील आणि राज्यातील योजना, तसेच शहरांसाठी वाढीव निधीचे आश्वासन दिले जात आहे. भाजपच्या या आक्रमक प्रचारनीतीमुळे आणि अंतर्गत सर्व्हेच्या आकडेवारीमुळे कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास दुप्पट झाला आहे. आता ३ डिसेंबरला मतपेटीतून येणारा कौल हा भाजपच्या अंतर्गत सर्व्हेनुसार लागतो का? हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

### बिहारसारखा रिझल्ट लागेल, आम्ही २०० जागा जिंकू

दरम्यान, भाजपचे नेते आणि राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी पक्षाच अंतर्गत सर्व्हे येण्याआधीच आम्ही २०० नगराध्यक्षपदाच्या निवडणुका जिंकणार असल्याचा विश्वास व्यक्त केला होता. महाराष्ट्रात भाजपने २५६ ठिकाणी उमेदवार दिले आहेत. त्यापैकी आम्ही किमान २०० नगराध्यक्षपदाच्या निवडणुका जिंकू. आमच्या सभांना मिळणारा प्रतिसाद हा उत्स्फूर्त आहे, ही धरून आणलेली गर्दी नाही. बिहार विधानसभा आणि नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र विधानसभेच्या निकालासारखेच यश भाजपला या निवडणुकीत मिळेल, असे ते म्हणाले होते.

# मिर्झांच्या सामाजिक सौहार्दाच्या शिकवणीला समाजात रुजवू या !

## 'हास्यसम्राट 'च्या शेकडो आठवणींने श्रद्धांजली सभेत हसू आणि रडू

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती -** महाराष्ट्राचे हास्य सम्राट डॉ. मिर्झा रफी अहमद बेग यांनी आपल्या काव्य प्रतिभेच्या ५० वर्षाच्या सिंचनातून निर्माण केलेल्या सामाजिक सौहार्दाला समाजात आणखीन घट्ट करण्यासाठी वचनबद्ध असू या ! असा सूर त्यांच्या श्रद्धांजली सभेत मान्यवरांनी आज व्यक्त केला.हास्य सम्राटाला श्रद्धांजली व्यक्त करताना हास्य व्यंगाची फोडणी देण्यात आली.

'हास्य सम्राट ', 'मिर्झा एक्सप्रेस ' डॉ. मिर्झा रफी अहमद बेग यांचे २८ नोव्हेंबरला निधन झाले. रविवारी दिनांक ३० नोव्हेंबर रोजी त्यांना अभिवादन करण्यासाठी अभियंता भवन, शेगाव नाका चौक, अमरावती येथे श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले होते.डॉ. मिर्झा रफी अहमद बेग यांच्यासोबत आयुष्य वेचलेल्या सामान्यातील सामान्य नागरिक या श्रद्धांजली सभेला आवर्जून उपस्थित होते.शासकीय अधिकारी,शेतीत काम करणाऱ्या शेतकऱ्यांपासून मंदिरांच्या ट्रस्टी पर्यंत आणि वारकरी संप्रदायाच्या अनुयायांपासून मुस्लिम समुदायातील मान्यवरांपर्यंत सर्वांनी आज त्यांना हास्यांजली अर्पण केली.आपल्या लेखणीतून



सर्व धर्मावर सर्व जातीपंथावर व्यंगात्मक टिपणी करून समाज प्रबोधन करण्याची खुमासदार शैली डॉक्टर मिर्झा रफी अहमद बेग यांना प्राप्त होती.त्यांच्या सिद्धहस्त लेखनीतून,विनोदी शैलीतून मनोरंजन तर व्हायचे मात्र प्रबोधनही व्हायचे.डॉक्टर मिर्झा हे खरे माणुसकीचे डॉक्टर होते.धर्मनिरपेक्षतेच्या सूत्रांवर त्यांनी शब्दांचे मनोरे रचले.ते राष्ट्रभक्त होते आणि त्यांच्या काव्यातून समाजातील आंतरिक दुही दूर करण्यात मदत झाली.त्यामुळे त्यांच्या अनुयायांनी त्यांच्या चाहत्यांनी याच मार्गक्रमणावर साहित्याचा कित्ता गिरवावा, असे आवाहन यावेळी मान्यवरांनी केले.उपजिल्हाधिकारी शामकांत मस्के यांच्या मार्गदर्शनात डॉ. मिर्झा रफी अहमद बेग मित्र मंडळाने आजच्या या श्रद्धांजली सभेचे आयोजन केले होते.यावेळी विचार मंचावर नागपूर उच्च न्यायालयाचे जेष्ठ विधीज्ञ डवोकेट फिरदोस मिर्झा, चंद्रपूरचे कवी किशोर मुगल,कोल्हापूरचे माहिती उपसंचालक प्रवीण टाके हे प्रतिनिधिक श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी स्थानापन्न झाले होते.डॉ.मिर्झा रफी यामध्ये यांचे कुटुंबीय त्यांचे निकटवर्तीय यांच्याशिवाय विविध क्षेत्रातील मान्यवर व त्यांचे बालमित्र या शब्दांजलीच्या कार्यक्रमात मोठ्या संख्येने उपस्थित होते.यामध्ये प्रामुख्याने चला हवा येऊ द्या फेम कवी प्रवीण तिखे,इतिहास संशोधक अनिरुद्ध पाटील,मराठी भाषा विभागाचे प्रमुख प्रा.हेमंत खडके ,जिल्हा माहिती अधिकारी गजानन कोटुरवार,गझलकार रुपेश कावलकर, ज्येष्ठ पत्रकार सनत अहाळे ,संतोष अरसोड, रमीझ मिर्झा, हुमा खान, जी बी देशमुख यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर यावेळी उपस्थित होते. अनेकांनी त्यांच्याच लोकप्रिय कविता ऐकवून व त्यावर भाष्य करत आपल्या संवेदना व्यक्त केल्या.

# सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या मेळाव्यात १५ कोटींचे कर्जवाटप

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१ अमरावती**

सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या वतीने विविध कर्ज योजनांची माहिती देण्यासाठी आउटरीच कॅम्पचे आयोजन शुक्रवार, दि. २८ नोव्हेंबर रोजी करण्यात आले.

या मेळाव्यात ग्राहकांना पंधरा कोटी रुपयांचे कर्ज वाटप करण्यात आले.सेंट्रल बँक ऑफ इंडियाद्वारे अभियंता भवन येथे रिटेल क्रेडिट आउटरीच कॅम्प पार पडला.

प्राथमिक शिक्षक संघटनेचे अध्यक्ष अजय पवार अध्यक्षस्थानी होते. कार्यक्रमाला सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे क्षेत्रीय प्रमुख सुनील पाण्डेय, उपजिल्हाधिकारी प्रसेनजीत चौहान, पी. आर. पोटे इंजिनियरिंग कॉलेजचे प्राचार्य डॉ. प्रदीप जावंदिया, अप्पर पोलिस आयुक्त अनिल कुरलकर, अमरावती विद्यापीठाच्या उपसंचालक डॉ. साक्षी ठाकुर उपस्थित होते.उपस्थिताना प्रसेनजीत चौहान, डॉ. प्रदीप जावंदिया यांनी मार्गदर्शन केले. अजय




पवार यांनी, सेंट्रल बँक ही सर्वात जास्त ग्राहक केंद्रित बँक आहे. इतर ठिकाणी कर्ज प्रकरणे मंजूर होणे जिकरीचे काम असताना सेंट्रल बँक मेळावे घेऊन कर्ज योजनांची माहिती देत आहे.

तसेच कर्ज प्रकरणे गतीने मंजूर करीत आहे. यामुळे बँकेच्या ग्राहकांना लाभ होत आहे. सेंट्रल बँकेच्या विविध योजना यामध्ये होम लोन, व्हीइकल लोन, पर्सनल लोन यांचे सादरीकरण सेंट्रल बँकेचे मार्केटिंग ऑफिसर अतुल खुले यांनी केले.सुनील पाण्डेय यांनी प्रास्ताविक केले. निलेश मुंढेकर यांनी सूत्रसंचालन केले. जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक नरेश हेडाऊ यांनी आभार मानले.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

सोमवार दि. १ डिसेंबर २०२५ शहर/ग्रामिण

# अंजनगाव नगरपालिकेच्या निवडणुकीला ब्रेक

## आदेश धडकताच शहरात सन्नाटा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अंजनगाव सुर्जी–** अंजनगाव सुर्जी नगरपरिषद निवडणुकीच्या मतदानाला अवघे काही तास उरलेले असतानाच निवडणुकीला ब्रेक लागला असून अंजनगाव सुर्जी नगरपरिषद निवडणुका पुढे ढकलण्यात आली आहे. त्यामुळे कार्यकर्ते आणि उमेदवारांच्या उत्साहावर पाणी फेरले गेले.नगरपरिषदांच्या निवडणुकींच्या प्रचारासाठी आज रविवार आहे. उद्या प्रचाराच्या तोफा थंडावणार होता. पण त्यापूर्वीच एक आदेश नगरपरिषद प्रशासनाला आला असल्याने त्या आदेशाची दोन मिनिटात शहरात वाऱ्याच्या वेगाने चर्चा पसरली आणि निवडणूक पुढे ढकलण्यात आली असल्याची जागोजागी चर्चा होत होती. ही निवडणूक पुढे ढकलल्या मुळे कार्यकर्त्यांमध्ये चेहऱ्यावर निराशा दिसून येत होती तर शहरात सर्वत्र सन्नाटा पसरला होता जणू काही खुप मोठी घटना घडली असे वातावरण शहरात दिसू लागले होते.अंजनगाव सुर्जी नगर परिषदेची निवडणूक स्थगित करण्यात आली असल्याने आता,




येणाऱ्या २० डिसेंबरला मतदान होणार असून २१ डिसेंबरला मतमोजणी होत आहे. नगरसेवक पदाच्या दोन उमेदवारांनी आणि नगराध्यक्ष पदाच्या एका उमेदवारांनी अपील केल्याने निवडणूक आयोगाने हा निर्णय घेतला आहे. त्यामध्ये एका नगरसेवकपदाच्या उमेदवाराची याचिका कोर्टाने फेटाळली. मात्र, एक नगरसेवक आणि नगराध्यक्षपदाच्या उमेदवारांच्या बाजूने कोर्टाने निर्णय दिला. आकाश सुखदेव राऊत हे नगराध्यक्ष पदाचे अपक्ष उमेदवार होते. कोर्टाने त्यांच्या बाजूने निकाल दिला आहे. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी यांच्या नामांकनात त्रुटी काढल्याने अर्ज बाद केला होता. अपील प्रकरणात न्यायालयाचा निर्णय २५ तारखेला आला आहे. आता, अर्ज मागे घेण्यापासून पुन्हा एकदा या ठिकाणी निवडणुकीची प्रक्रिया सुरू होणार आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांना काही दिवस आराम करून पुन्हा आपल्या उमेदवारांसाठी निवडून आणण्यासाठी प्रचाराला सुरुवात करावी लागणार आहे.

# फोनवरून बॉम्बस्फोटाची धमकी देणाऱ्याचा इंदोरमध्ये पर्दाफाश



## गुन्हे शाखेची दबंग करकाई

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.१अमरावती**

अमरावती शहर पोलीस नियंत्रण कक्षावर २९ नोव्हेंबर २०२५ रोजी एका अज्ञात व्यक्तीने शहरात बॉम्बस्फोट करण्याची धमकी दिल्याने एकच खळबळ उडाली होती. घटनेची गंभीर दखल घेत गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण यांनी तातडीने विशेष पथकाची नियुक्ती केली.

पथकाने धमकी देण्यासाठी वापरलेल्या मोबाईल क्रमांकाचा मागोवा घेत संबंधित व्यक्तीचा ठावठिकाणा मिळवला. आरोपी इंदोर (मध्य प्रदेश) येथे असल्याची खात्री पटताच गुन्हे शाखेचे पथक इंदोरमध्ये दाखल झाले. तेथील पोलिसांच्या मदतीने कौशल्यपूर्ण कारवाईत आरोपीला ताब्यात घेण्यात आले. त्याच्यावर फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपासासाठी त्याला फ्रेजरपुरा ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.

ताब्यात घेतलेला आरोपी सोहेल पांडूरंग शेख (वय ३३, रा. रहाटगाव, अमरावती) हा यापूर्वीही अशाच प्रकारे बॉम्बस्फोटाची धमकी देणे व पोलिसांना अश्लील शिवीगाळ करणे यांसारख्या गंभीर कृत्यांमध्ये सामील असल्याचे समोर आले आहे.ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, श्याम घुगे, रमेश धुमाळ, शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण यांच्या नेतृत्वात अंमलदार फिरोज खान, सतीश देशमुख, नईम बेग, रंजीत गावंडे व प्रभात पोकळे यांनी केली.

# वैभव कॉलनीत महिलेची गळा चिरून निर्घृण हत्या

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती–** राजापेठ पोलीस ठाणे हद्दीतील हरीओम कॉलनीलगत असलेल्या वैभव कॉलनीत रविवारी सायंकाळी सुमारे ७ वाजता एका महिलेची अत्यंत क्रूरपणे हत्या झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. मृत महिलेचे नाव निलीमा उर्फ पिंकी संजय खरबडे (४०) असे आहे. माहितीनुसार, निलीमा वैभव कॉलनीतील दोन मजली इमारतीत एकटीच राहत होती. रविवारी सायंकाळी तिच्या बहिणीचा मुलगा तिला भेटण्यासाठी आला असता, ती घरात मृत अवस्थेत आढळली. तिच्या गळ्यावर धारदार शस्त्राने वार केलेला होता. नातेवाईकांनी तत्काळ राजापेठ पोलिसांना माहिती दिली.थानेदार पुनीत कुलट यांनी पथकासह घटनास्थळी धाव घेतली. उपायुक्त गणेश शिंदे, सहाय्यक पोलिस आयुक्त श्याम घुगे, फॉरेन्सिक तज्ज्ञांची टीम तसेच गुन्हे शाखेचे पीआय संदीप चव्हाण यांनीही घटनास्थळी पोहोचून पाहणी केली. मात्र आरोपी कोण आणि हत्या का करण्यात आली, याबाबत पहिल्या टप्प्यात कोणतेही ठोस संकेत मिळाले नाहीत.मृत महिलेच्या कुटुंबावर चार वर्षांपूर्वीच मोठे संकट आले होते. तिच्या २१ वर्षांच्या मुलाचा मृत्यू झाला होता. काही वर्षांनी पतीचाही मृत्यू झाला. त्यामुळे निलीमा एकटी राहत होती. आता तिच्या हत्येमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

### हत्येचा तपास गतीने सुरु

घटना समजताच क्राईम ब्रांच, राजापेठ डीबी स्काड आणि स्थानिक पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली. रविवारी निलीमाला भेटण्यासाठी आलेल्या काही व्यक्तींची चौकशी करण्यात आली. त्यापैकी काही संशयितांना अधिक चौकशीसाठी पोलिस ठाण्यात ताब्यात घेण्यात आले आहे.

# भीषण अपघातात हिंदू महासभेच्या प्रदेशाध्यक्षासह एकाचा मृत्यू

## अनियंत्रित कार भिंतीवर आदळल्याने झाला अपघात, बुधवारा परिसरात शोककळा


**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती–** अमरावती-बडनेरा मार्गावरील गायत्री नर्सरीलगतच्या भिंतीवर इकोस्पोर्ट कार आदळल्याने कारमधील दोघांचा घटनास्थळी मृत्यू झाला. ही घटना रात्री १ वाजताच्या सुमारास घडली. हिंदू महासभेचे प्रदेशाध्यक्ष नितीन नारायणराव व्यास (वय ५२) आणि रोशन वसंतआप्पा गनथडे (वय ३८ दोन्ही रा. दत्तमंदिर, कुंभारवाडा, बुधवारा,अमरावती) अशी मृतांची नावे आहेत. याघटनेने बुधवारा परिसरात शोककळा पसरली आहे. याघटनेत बडनेरा पोलिसांनी अपघाताचा गुन्हा दाखल केला.



धीरज नामदेवराव भारती (वय ४०, रा. इर्विन चौक) यांनी बडनेरा पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दिली की, नितीन व्यास त्यांचे मामेभाऊ आहेत आणि परिवारासह ते बुधवारा परिसरातील दत्तमंदिराजवळ राहतात. शनिवारी रात्री ९ वाजताच्या सुमारास व्यास यांच्या घरासमोर राहणारा रोशन गनथडे त्यांच्या घरी आला आणि दोघे व्यास यांच्या कार क्र. एम.एच. २७ ए.आर. ८३३३ मध्ये बसून बडनेरा मार्गावरील एका मित्राच्या शेतात कार्यक्रमात गेले होते.

कार्यक्रम आटोपल्यानंतर दोघे कारने अमरावतीला येत असताना अमरावती-बडनेरा मार्गावरील जायका पेट्रोल पंपाजवळील समकित कार गॅलरीसमोर कारवरील नियंत्रण सुटल्यामुळे कार युनिव्हर्सल ३ डी अलाइनमेंटच्या भिंतीवर आदळली. त्यामुळे कारचा पुढचा भाग पूर्णपणे तुटला. घटनेची माहिती बडनेरा पोलिसांना मिळताच पोलिसांचा ताफा घटनास्थळीपोहोचला आणि दोन्ही जखमींना तत्काळ खासगी रुग्णालयात दाखल केले. परंतु डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. नितीन व्यास व रोशन गनथडे यांचा अपघातात मृत्यू झाल्याची माहिती बुधवारा परिसरात पसरताच शेकडो नागरिकांनी रुग्णालयात धाव घेतली. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून दोन्ही मृतदेह शवविच्छेदनाकरिता पाठवून गुन्हा दाखल केला.



### सामाजिक कार्यात असायचे सक्रीय


नितीन व्यास व रोशन गनथडे हे दोघेही सामाजिक कार्यात सक्रीय राहत होते. तसेच परिसरात कोणाच्याही मदतीला धावून जात होते.परिसरात यादोघांची वेगळी ओळख होती. परंतु त्यांचा अपघाती मृत्यू झाल्यामुळे परकोटाच्या आतील परिसरात शोककळा पसरली आहे.

# झोनस्तरावर प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादी वरील हरकतींचे निराकरण करण्याचे काम युध्दस्तरावर सुरु

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती–**

अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक – २०२५ करीता मा. आयुक्त यांचे आदेशान्वये तक्रारीचे निराकरण करणेकरीता झोनस्तरावर प्रभाग निहाय सहायक आयुक्त यांचे नियंत्राणाखाली २२ पथक तयार करण्यात आले असून सदर पथकामध्ये प्रभाग निहाय अभियंता / वसुली लिपीक / स्वास्थ निरीक्षक / बि.एल.ओ. तसेच शिपाई व संगणक चालक व इतर अधिकारी / कर्मचारी यांचा समावेश आहे. अद्यापपर्यंत निवडणूक विभाग महानगरपालिका अमरावती मुख्य कार्यालय येथे प्रारुप मतदार यादीवर एकुण ५३१ हरकती प्राप्त झाले आहे.झोन स्तरावर प्रभाग निहाय २२ पथक मधील अधिकारी / कर्मचारी मार्फत हरकतधारकांशी प्रत्यक्ष संपर्क साधून स्थळ निरिक्षण करीत आहे. स्थळ निरीक्षण करतांना पथकास काही अडचण निर्माण झाल्यास अतिरिक्त आयुक्त, सहायक आयुक्त, सहायक निवडणूक अधिकारी , मतदार यादी तांत्रिक अधिकारी प्रत्यक्ष स्थळावर जाऊन हरकतधारकांचे संपुर्ण मत



ऐकुण व स्थळ निरीक्षण केल्यानंतर वस्तुस्थितीनूसार प्रारुप मतदार यादीमध्ये दुरुस्ती करण्यात येत आहे. अद्यापपर्यंत ३३७ हरकतीचे निराकरण करण्यात आले असून उर्वरीत १९४ हरकत धारकांशी संपर्क साधून मतदार यादीत दुरुस्ती करणे युध्दस्तरावर सुरु आहे.

अमरावती महानगरपालिका परीक्षेत्रातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, आपले नांव https://mahasecvoterli st.in/ संकेत स्थळावर व सदर प्रारूप मतदार यादी नागरिकांच्या पाहणीकरिता स्व. सुदामकाका देशमुख सभागृह महानगरपालिका मुख्य कार्यालय, अमरावती. तसेच खालील झोन कार्यालयांमध्ये उपलब्ध आहे :झोन क्र. १ – रामपुरी कॅम्पझोन क्र. २ – राजापेठझोन क्र. ३ – दस्तुरनगरझोन क्र. ४ – बडनेराझोन क्र. ५ – भाजीबाजारआपल्या नावाची मतदार यादीतील नोंद तपासावी आपले प्रभागात आहे किंवा नाही याबाबत खात्री करावी व काही हरकती असल्यास निवडणूक विभाग महानगरपालिका, अमरावती मुख्य कार्यालय येथे दि. ०३/१२/२०२५ पर्यंत हरकती दाखल करण्यात याव्या जेणे करुन अचुक व पारदर्शी अंतिम मतदार यादी तयार करण्यास मदत होईल व कोणताही मतदार मतदानापासून वंचीत राहणार नाही.


# तांबट: अमरावतीचा शहरपक्षी घोषित

## सर्वाधिक मते मिळवत तांबट हा अमरावतीचा अधिकृत शहर पक्षी म्हणून निवड

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१ अमरावती –** पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने ऐतिहासिक पाऊल टाकत अमरावती महानगरपालिकेने आज शहराचा अधिकृत शहर पक्षी – तांबट (उेर्शिींाळींह इरीलशीं) जाहीर केला. हा उपक्रम माझी वसुंधरा अभियान ६.० अंतर्गत राबविण्यात आला असून, घोषणा अमरावती महानगरपालिका आयुक्त, ख-ड सौम्या शर्मा चंदक यांच्या हस्ते हॅपी स्ट्रीट कार्यक्रम येथे करण्यात आली. शहरपक्षी निवडीसाठी अमरावती महानगरपालिका (-चउ) आणि वन्यजीव पर्यावरण व संरक्षण संस्था, अमरावती (थएउड) यांच्यात एमओयू करण्यात आला होता. नागरिकांच्या सहभागातून प्रक्रिया पारदर्शक करण्यासाठी विशेष ऑनलाइन पोर्टल तयार करण्यात आले. निवड प्रक्रिया १८ नोव्हेंबर ते २८ नोव्हेंबर २०२५ दरम्यान खुली ठेवण्यात आली होती. त्यानंतर ३० नोव्हेंबर २०२५ रोजी अंतिम निकाल जाहीर करण्यात आला. अमरावतीकरांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवत एकूण ५,४४५ मते नोंदवली.

**उपक्रमाचे उद्दिष्ट:**




अमरावतीला एक अनोखी, पर्यावरणपूरक ओळख देणे, घोषणेसोबतच, शहरातील पर्यावरणीय अभिमानाचे प्रतीक म्हणून तांबट पक्ष्याची एक भव्य मूर्ती लवकरच उभारण्यात येणार आहे, ज्यामुळे या उपक्रमाची कायमस्वरूपी आठवण शहरात जपली जाईल., हा उपक्रम राबवून अमरावती हे महाराष्ट्रातील पहिले महापालिका शहर ठरले आहे, ज्याने अधिकृत शहर पक्षी जाहीर करून पर्यावरण संरक्षणात अग्रणी भूमिका बजावली आहे. अमरावती महानगरपालिका व WECS यांचे हे संयुक्त पाऊल शहराच्या हरित भविष्यासाठी दिशादर्शक ठरत आहे.

### नागरिकांच्या निवडीतील निकाल पुढीलप्रमाणे

| | |
|---|---|
| तांबट – | १४१४ मते |
| मोठा कोतवाल | – १०३२ मते |
| भारतीय राखी शहामृग | – ९९८ मते |
| हुडहुडी | – ७९६ मते |
| छोटे घुबड | – ६५५ मते |
| शिकरा | – ५५१ मते |

सर्वाधिक मते मिळवत तांबट हा अमरावतीचा अधिकृत शहर पक्षी म्हणून निवडला गेला.

# अमरावती विभागातील ४१ नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकीसाठी ३२० उमेदवार

## अध्यक्ष पदासाठी, ५,०६७ उमेदवारसदस्य पदासाठी निवडणूक लढविणार

### २ डिसेंबर रोजी मतदान तर ३ डिसेंबरला मतमोजणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती,**

राज्यातील २४६ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायतींच्या (एकूण २८८) सदस्यपदासाठी आणि थेट अध्यक्षपदाच्या सार्वत्रिक निवडणुकींचा कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाने जाहिर केला आहे. त्यानुषंगाने अमरावती विभागातील ४१ नगरपरिषदा व ४ नगरपंचायतींच्या निवडणुकीसाठी ३२० उमेदवार अध्यक्ष पदाकरिता, तर ५,०६७ उमेदवार सदस्य पदाकरिता निवडणूक लढविणार आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या निवडणूक कार्यक्रमानुसार, मंगळवार दि. २ डिसेंबर २०२५ रोजी, अध्यक्ष व सदस्य पदाकरिता मतदान होणार आहे. सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० पर्यंत मतदानाची वेळ असेल. तसेच सर्व संबंधित ठिकाणी मतमोजणी दि. ३ डिसेंबर २०२५ रोजी, सकाळी १०.०० वाजेपासून सुरु होईल. निकाल जाहीर झाल्यानंतर नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या क्षेत्रापुरती आचारसंहिता संपुष्टात येईल.

जिल्हानिहाय तपशील पुढीलप्रमाणे :

अमरावती जिल्ह्यातील १२ नगरपरिषद/नगरपंचायतीत (चांदूरबाजार, दर्यापूर, चांदूररेल्वे, नांदगाव- खंडेश्वर(न.पं.), धारणी(न.पं.), धामणगाव रेल्वे, वरुड, अंजनगाव सुर्जी, अचलपूर, शेंदूरजना घाट, मोर्शी चिखलदरा) एकूण ७१ उमेदवार अध्यक्ष पदासाठी, तर १,२५५ उमेदवार सदस्य पदासाठी निवडणूक लढविणार आहे. तसेच चिखलदरा नगरपरिषदेत एक सदस्य बिनविरोध आहे.

अकोला जिल्ह्यातील ६ नगरपरिषद/नगरपंचायतीत (अकोट, बाळापूर, मुर्तीजापूर, तेल्हारा, हिवरखेड, बार्शीटाकळी) एकूण ३९ उमेदवार अध्यक्ष पदासाठी तर ७०७ उमेदवार सदस्य पदासाठी निवडणूक लढविणार आहे.

यवतमाळ जिल्ह्यातील ११ नगरपरिषद/नगरपंचायतीत (यवतमाळ, आर्णी, दारव्हा, ढाणकी (न.पं.), दिग्रस, घाटंजी, नेर-नबाबपूर, पांढरकवडा, पुसद, उमरखेड, वणी) एकूण ८८ उमेदवार अध्यक्ष पदासाठी, तर १,३८७ उमेदवार सदस्य पदासाठी निवडणूक लढविणार आहे.




बुलडाणा जिल्ह्यातील ११ नगरपरिषद/नगरपंचायतीत (बुलढाणा, चिखली, देऊळगाव राजा, जळगाव-जामोद, खामगाव, लोणार, मलकापूर, मेहकर, नांदुरा, शेगाव, सिंदखेडराजा) एकूण ८७ उमेदवार अध्यक्ष पदासाठी, तर १,१७० उमेदवार सदस्य पदासाठी निवडणूक लढविणार आहे. तसेच मलकापूर नगरपरिषदेत दोन सदस्य आणि खामगाव नगरपरिषदेत एक सदस्य बिनविरोध आहेत.

वाशिम जिल्ह्यातील ५ नगरपरिषद/नगरपंचायतीत (वाशिम, कारंजा, रिसोड, मंगरुळपीर, मालेगाव(न.पं.)) एकूण ३५ उमेदवार अध्यक्ष पदासाठी, तर ५४८ उमेदवार सदस्य पदासाठी निवडणूक लढविणार आहे.

### रहाटगाव उड्डाणपुलातील राख विक्री प्रकरण:

# दोन आठवड्यानंतरही कारवाई नाही

# शासन आणि प्राधिकरणचे संशयास्पद मौन

## पाणी नेमके मुरली कुठे?



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१नांदगाव पेठ** रहाटगाव येथील उड्डाणपुलाच्या बांधकामासाठी मौदा ऊर्जा प्रकल्पातून आणण्यात येणारी राख स्थानिक व्यावसायिकांना सर्रास विक्री करण्यात आल्याचा भीषण प्रकार उघड झाल्यानंतर जिल्ह्यात प्रचंड खळबळ उडाली आहे.स्थानिक वाहन मालकांनी १६ नोव्हेंबर रोजी हा गंभीर प्रकार उजेडात आणल्यानंतर तब्बल दोन आठवडे उलटले तरी प्रशासन, राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (छक-ख) यांच्या कडून कोणतीही अधिकृत तक्रार दाखल करण्यात आलेली नाही, ही सर्वात धक्कादायक बाब आहे. उड्डाणपुलासाठी मौदा प्रकल्पातून ट्रकमधून राख आणून रहाटगाव येथे साठवली जाते. मात्र, जंडू आणि स्वामी समर्थ कन्स्ट्रक्शन कंपनीचे व्यवस्थापक आणि कर्मचारी यांनी हीच राख प्रति ट्रक चार ते पाच हजार रुपये घेऊन खुलेआम विक्री केल्याचा आरोप वाहन मालकांनी केला होता. त्यांनी दोन आठवड्यांपूर्वी जागेवर उपस्थित राहून हा प्रकार उघड केला आणि संपूर्ण घडामोडींची माहिती माध्यमांना दिली. या अवैध विक्रीतून कंत्राटदाराने लाखोंची कमाई केली असून जनतेच्या पैशाला थेट चुना लावण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे. घोटाळा उघड झाल्यानंतर भाजप ट्रान्सपोर्ट सेलचे जिल्हा संयोजक राजू चिरडे यांनी नांदगाव पेठ पोलीस स्टेशनमध्ये लेखी तक्रार दाखल केली, मात्र उलटपक्षी ज्यांनी तक्रार करणे आवश्यक होते त्या शासन यंत्रणा आणि राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणने पूर्णता शांतता स्वीकारली आहे. प्रशासनाने किंवा प्राधिकरण ने तक्रार नोंदवली नसल्याने 'या ठिकाणाहून राख चोरलीच गेली नाही' असा धक्कादायक अर्थ या मौनातून दिसतो, असे आरोप नागरिकांकडून होत आहेत. एवढा मोठा घोटाळा उघडकीस येऊनही संबंधित यंत्रणांची निष्क्रियता पाहता हा संपूर्ण प्रकार कंत्राटदार-अधिकारी संगनमताने केल्याची शक्यता बळावत आहे. उड्डाणपुलाच्या बांधकामाच्या गुणवत्तेशी थेट संबंध असलेल्या राखेची अशी अवैधरित्या विक्री झाल्याने प्रकल्पाची गुणवत्ता, निधीचा वापर, पारदर्शकता या सगळ्यांवर मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. जंडू आणि स्वामी समर्थ कन्स्ट्रक्शन कंपनीच्या या गैरप्रकाराला शासन आणि प्रशासनाची मूक संमती मिळाली नसती तर एवढ्या मोठ्या प्रमाणावर राख विक्रीचा व्यवहार होणे अशक्य आहे, अशी उघड चर्चा नागरिकांमध्ये सुरु झाली आहे.दोन आठवडे उलटूनही कोणतीही कारवाई न झाल्याने या प्रकरणाची तीव्रता आणखी वाढली असून नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. राख घोटाळ्याची उच्चस्तरीय चौकशी करून संबंधित कंपनी, कर्मचारी आणि या घोटाळ्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या यंत्रणांवर तातडीने कारवाई करावी, अशी जोरदार मागणी आता सर्वच स्तरातून होत आहे.

# राजेश अग्रवाल यांनी स्वीकारला मुख्य सचिव पदाचा पदभार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३१मुंबई-** महाराष्ट्र राज्याचा विकास आणि गौरव वाढीसाठी सातत्याने काम करत राहणार, असे प्रतिपादन राज्याचे नवनियुक्त मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी केले आहे. राज्याचे मावळते मुख्य सचिव राजेशकुमार यांच्याकडून नवनियुक्त मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी रविवारी पदभार स्वीकारला. त्यावेळी ते बोलत होते.

मंत्रालयातील मुख्य सचिवांच्या दालनात झालेल्या या कार्यक्रमाप्रसंगी वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव मनिषा वर्मा, सामान्य प्रशासन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव व्ही. राधा, कृषी विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी, गृह विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव (अ.व.सु) राधिका रस्तोगी, मदत पुनर्वसन व आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या प्रधान सचिव विनिता वैद-सिंगल, ग्राम विकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, मुख्यमंत्री



कार्यालयाचे सचिव श्रीकर परदेशी, सामान्य प्रशासन विभागाचे सचिव पंकज कुमार, पर्यावरण विभागाच्या सचिव जयश्री भोज, पशुसंवर्धन, दुग्ध विकास व मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव रामास्वामी एन, दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंडे, माहिती तंत्रज्ञान विभागाचे सचिव वीरेंद्र सिंह, मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त अमित सैनी यांच्यासह मुख्य सचिव कार्यालय व अन्य विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# निवडणूक काळात अवैध दारूचा महापूर राज्य उत्पादन शुल्क विभाग झोपेत?

## निवडणुकीच्या तोंडावर फक्त दाखवण्यासाठी कारवाई!

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१अमरावती** जिल्ह्यात नगरपालिका व नगरपरिषद निवडणुकीने जोर धरला असताना अवैध हातभट्टी आणि गावठी दारूचा महापूर सुरू असून कायदा-सुव्यवस्थेला सरळसरळ आव्हान दिले जात आहे. या गंभीर परिस्थितीकडे राज्य उत्पादन शुल्क विभाग जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याची टीका वाढत आहे. प्रहार संघटनेने अवैध दारूविक्री व वाहतूक या गंभीर प्रश्नावर आवाज उठवला तरी विभागाला जाग आली नसल्याचा आरोप होत असून, निवडणुकीच्या धामधुमीत फक्त दाखवण्यासाठी एकच कारवाई झाली असल्याचे उघड झाले आहे.

या एकमेव कारवाईत २७ नोव्हेंबर २०२५ रोजी मोर्शी-वरुड मार्गावरील मनिमपूर फाट्यानजीक गावठी दारू वाहतूक करणाऱ्या आरोपी जीवन प्रभाकर भंडारे (रा. जरुड, ता. वरुड) याच्याकडून १,२४० लिटर गावठी दारू व एक चारचाकी वाहन असा ४ लाख ४८ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.ही कारवाई आयुक्त डॉ. राजेश देशमुख, सहआयुक्त प्रसाद सुर्वे यांच्या आदेशानुसार तर विभागीय उपआयुक्त डॉ. पराग नवलकर यांच्या मार्गदर्शनाखाली विभागीय भरारी पथकाने केली. प्रभारी निरीक्षक एम. पी. चिटमटवार, दुय्यम निरीक्षक एस. ए. वानखडे, टी. आय. शेख यांच्या नेतृत्वाखाली जवानांनी ही धडक कारवाई केली. पुढील तपास दुय्यम निरीक्षक टी. आय. शेख करीत आहेत. परंतु खरा सवाल असा आहे की,जिल्ह्यात अवैध दारूचे जाळे एवढे मोठे असताना एकच कारवाई करून काय साधले?निवडणूक जाहीर होताच अवैध दारूचा पूर



वाढतो, याची सर्वांना कल्पना असताना विभागाकडून मोठ्या प्रमाणात छापे, सापळे व प्रतिबंधात्मक मोहीम अपेक्षित होती. मात्र वास्तव उलट दिसत असून, विभाग जणू हात झटकून बसल्याचे चित्र आहे.प्रहारने या विषयावर ठाम भूमिका घेत अवैध दारूविक्रीवर कठोर कारवाईची मागणी केली होती, तरीही विभागाने वेळीच पावले न उचलल्याने ही कारवाई केवळ कागदी औपचारिकता व दाखवण्यासाठीची मोहीम असल्याची चर्चा जनमानसात रंगत आहे. जिल्ह्यात अवैध दारूचा बाजार गगनाला भिडलेला असताना राज्य उत्पादन शुल्क विभाग नेमके का मौन बाळगत आहे? निवडणुकीच्या काळात वाढणाऱ्या अवैध दारू व्यवसायावर अंकुश आणण्याची जबाबदारी कोणाची?हे सर्व प्रश्न अनुत्तरितच राहिले असून विभागाचे मौन आता कोडे बनले आहे.अमरावती जिल्ह्यातील सुरक्षा, कायदा-सुव्यवस्था आणि निवडणूक प्रक्रिया धोक्यात आणणाऱ्या अवैध दारूविक्रीवर तातडीने मोठ्या स्तरावर कारवाई होणे आवश्यक आहे, अशी जनतेची ठाम मागणी आहे.

# दर्यापूर नगरपालिका तर्फे निवडणुकीचे यशस्वी नियोजन

## सात टेबलवर होणार मतमोजणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१ दर्यापूर-** दर्यापूर नगर परिषद प्रशासनाच्या माध्यमातून नगरपरिषद निवडणुकीचे यशस्वी नियोजन आखण्यात आले आहे गेल्या पंधरा दिवसापासून पालिका कर्मचारी वृंद हे रात्रंदिवस डोळ्यात तेल घालून कर्तव्यावर तत्पर आहेत अनेक किचकट स्वरूपाच्या प्रक्रिया त्यांना पार पाडाव्या लागत आहेत ऐनवेळी निवडणूक आयोगाकडून आलेले फेरबदल तसेच उमेदवार यांच्यामधील काही अडचणी आल्यास त्यांचे निरसन ताबडतोब करण्यात येत आहे दर्यापूर पालिकेमध्ये ईव्हीएम मशीन वाटपासाठी भव्य सभा



मंडप उभारण्यात आला आहे मतमोजणीसाठी सुद्धा नगरपरिषद मध्ये जाडी बांधून विशेष कक्ष स्थापन करण्यात आला उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी यांना केवळ ओळखपत्रावर प्रवेश मिळणार आहे दर्यापूर पालिकेत मतमोजणी ही सहा टेबलवर होणार असून सातवा टेबल हा पोस्टल मताचा असेल एकावेळी दोन प्रभागाचे निकाल जाहीर होणार आहेत एकूण बारा वार्ड साठी सहा निकाल येणार व सर्वात शेवटी अध्यक्ष पदाचा निकाल जाहीर होणार असल्याचे दर्यापूर निवडणूक प्रभारी यांच्यातर्फे सांगण्यात आले या निवडणूक प्रक्रियेमध्ये एकूण १५६ कर्मचारी बांधव निवडणुक कामात व्यस्त आहेत तर जवळपास ५० पोलिसांचा फौज फाटा तैनात करण्यात आलेला आहे प्रशासक विकास खंडारे व निवडणूक अधिकारी दादासाहेब दराडे अतिरिक्त निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. रवींद्र कुमार कानडजे यांना मार्गदर्शनात कर्मचारी वृंद निवडणुकीचे कामकाज सांभाळत आहेत.

# दर्यापूर नगरपरिषद चा नगराध्यक्ष निवडणार छत्तीस हजार ५७१ मतदार

## मुस्लिम व बौद्ध मतदारांकडे लागले सर्व पक्षाचे लक्ष

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१ दर्यापूर-** दर्यापूर नगर परिषदेची निवडणूक चार दिवसांवर येऊन ठेपले असून तशी व पाहिल्यास सध्या प्रचारासाठी तीनच दिवस हे बाकी राहिलेले असून एक तारखेला प्रचार हा संपणार आहे त्या बाभळी बनोसा दर्यापूर असे तीन गाव मिळून तयार झालेले दर्यापूर दर्यापूर मतदार संघात ३६ हजार ५७१ मतदार मतदान करणार आहेत त्यामध्ये प्रामुख्याने १८१४२ पुरुष तर १८ ४२९ महिला कार्यरत आहेत या सर्वांचा विचार जर केला तर सर्वात जास्त मतदान आहे ते मुस्लिम आणि बौद्ध समाज यांचा असल्यामुळे ही निवडणूक विशेषता जास्त करून या दोन समाजाच्या मतदारांवर अवलंबून असून असं असलं तरी इतर सर्व समाज हा सुद्धा प्रामुख्याने महत्त्वाचा ठरणार आहे व त्यामध्ये काँग्रेस ही फक्त स्वतंत्र निवडणूक लढत आहे तर भाजपा यांनी सोबत शिंदे गटाला घेतलेला आहे व तिसरा उमेदवार राष्ट्रवादी अजित पवार गट यांचा असून तो सुद्धा सक्षम असा



उमेदवार आहे आज तरी ही निवडणूक तिरंगी असल्याचे दिसत आहे एक चौथा उमेदवार जो आहे तो उद्धव बाळासाहेब ठाकरे गट शिवसेना स्वतंत्र असून मात्र त्यांचे नगरसेवक फक्त पाचच उभे आहेत पण एक नगराध्यक्ष पदासाठी उमेदवार उभा असल्याने तो सुरुवातीला असे वाटत होते की लढत ही चौरंगी होईल मात्र जसजशी दिवस कमी होत आले आहे तर त्याचं चित्र हे बदलत चालला आहे व निवडणूक सुद्धा तीन दिवसांवर येऊन ठेपली आहे त्यामुळे आज असे वाटते की निवडणूक तिरंगी किंवा दुरंगी होण्याचे चित्र दिसत आहे लढत मात्र आहे तिघांमध्येच काँग्रेस भाजपा राष्ट्रवादी शरद पवार गट व शिवसेना शिंदे गट यामध्येच होणार आहे मतदार काय करतात त्यावर अवलंबून आहे.

# अखेर नकली नोटांचा मुख्य सूत्रधार जाळ्यात

## छपाई साहित्यांसह २१ हजारांच्या नोटा जप्त



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१नांदगाव पेठ-** रहाटगाव येथे दीड महिन्यांपूर्वी दोन आरोपींकडून नकली चलनी नोटा जप्त करण्यात आल्या होत्या त्यांनतर आणखी तीन आरोपी ताब्यात घेण्यात आले होते मात्र मुख्य सूत्रधार अद्यापही फरार असल्याने नांदगाव पेठ पोलिसांसह गुन्हे शाखेपुढे मोठे आव्हान होते मात्र पोलिसांनी मुख्य सुत्रधारास देखील अटक केली त्याच्याकडून २१ हजारांच्या नकली नोटांसह छपाई साहित्य देखील जप्त करण्यात आले आहे. १५ ऑक्टोबर २०२५ रोजी दाखल या प्रकरणात यापूर्वी संचित अरविंद चव्हाण, दिपक बाबुलाल खंडारे, आदित्य किशोर रामेकर, यश सतिष बर्वे आणि साहील संजय गाडवैल या पाच जणांना अटक झाली होती. त्यांच्या ताब्यातून ५ रुपयांच्या १६७ नोटा, एकूण ८३,५०० रुपये जप्त करण्यात आले होते.दरम्यान या प्रकरणातील मुख्य सूत्रधार हा मोठ्या प्रमाणावर नकली नोटा तयार करून चलनात आणत असल्याची गोपनीय माहिती नांदगावपेठ पोलिसांना मिळाली. त्यानुसार २८ नोव्हेंबर २०२५ रोजी तपास पथकाने सुफीयाना नगर, अमरावती येथील अब्दुल तौसिफ अब्दुल करीम (वय २६) याला ताब्यात घेतले.

तपासादरम्यान चौकशी केली असता तौसिफने नकली नोटा स्वतः तयार केल्या तसेच इतर आरोपींना पुरवल्याचे कबूल केले. त्याच्या घरावर दोन पंचांच्या उपस्थितीत घेतलेल्या झडतीत नोटनिर्मितीसाठी लागणारे साहित्य - हिरव्या रंगाचा प्लाटिंग थ्रेट, ट्रेसिंग पेपर, रबरी शिक्के, कटर, ग्लू, प्रिंटर, बॉण्ड पेपर तसेच तयार केलेल्या नकली नोटा जप्त करण्यात आल्या.यामध्ये ५०० रुपयांच्या २० नोटा व २०० रुपयांच्या ५५ नोटा अशा एकूण २१,००० रुपयांच्या बनावट नोटांचा समावेश आहे. तपासात तौसिफ याच्यावर पूर्वी नागपूरच्या गणेशपेठ पोलीस ठाण्यातही नकली नोटांबाबत गुन्हा नोंद असल्याचे उघड झाले.ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरीया, पोलीस उपायुक्त परीमंडळ १चे गणेश शिंदे आणि सहायक पोलीस आयुक्त कैलास पुडकर यांच्या मार्गदर्शनात पोलीस स्टेशन नांदगावपेठ येथील वरिष्ठ पो. नि.दिनेश दहातोंडे यांनी केली यावेळी पोउपनि वाकडे , पोहेकों राजाभाऊ राऊत, पोकॉ. राझीक खान, पोकॉ.सैफुदीन पठाण, पोकॉ. निलेश सावीकर पोकॉ. वैभव तिखिले व पोकॉ.संजय नेहारे यांचा महत्वपूर्ण सहभाग होता.

### आव्हानात्मक कारवाई

नांदगावपेठ परिसरात वाढत्या नकली चलन प्रकरणांमुळे तपास अधिक गुंतागुंतीचा होत होता. मुख्य सूत्रधार सतत ठिकाणे बदलत असल्याने त्याच्यावर नजर ठेवणे हे मोठे आव्हान होते. गोपनीय माहितीची पडताळणी, तांत्रिक तपास, आणि पथकाचे समन्वय यामुळे अखेर ही कारवाई शक्य झाली.अटक केलेल्या आरोपीकडून छपाईचे अत्याधुनिक साहित्य, तयार नोटा आणि चलननिर्मितीसाठीचे साधनसामुग्री जप्त करून संपूर्ण रॅकेटचा खुलासा करण्यात यश आले.आरोपीला न्यायालयात हजर करण्यात आले न्यायालयाने आरोपीला दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. ही कारवाई अत्यंत आव्हानात्मक होती.

**दिनेश दहातोंडे पोलिस निरीक्षक**

# अमरावतीत ग्रामपंचायत वाद चिघळला

## गाडीसमोर उभे राहिलेल्या सदस्यांचे थरारक दृश्य सीसीटीव्हीत

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१ अमरावती** अमरावती जिल्ह्यातील रेवसा ग्रामपंचायतीतील आमसभेदरम्यान ग्रामसेवक आणि दोन ग्रामपंचायत सदस्यांमध्ये गंभीर वाद निर्माण झाला. रजिस्टरमध्ये माहिती भरण्याच्या मुद्द्यावरून सुरू झालेला वाद एवढा चिघळला की दोन्ही सदस्यांनी ग्रामसेवकाची गाडी अडवण्याचा प्रयत्न केला.

या दरम्यान ग्रामसेवकाने वाहन पुढे घेतल्याने सदस्यांना काही अंतर गाडीसमोरून ढकलल्याप्रमाणे पुढे नेले गेले. ही संपूर्ण घटना ग्रामपंचायत परिसरातील सीसीटीव्हीमध्ये कैद झाली आहे. सुदैवाने यात कोणतीही जखमी किंवा मोठी दुर्घटना घडलेली नाही.

घटनेनंतर ग्रामपंचायत परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पुढील कारवाईसाठी दोन्ही पक्षांनी पोलिसांकडे जाण्याची शक्यता व्यक्त केली असून पाहणी अहवालाच्या आधारे प्रशासन पुढील पावले उचलणार आहे.

# स्वच्छतेचा कंत्राट कोणार्क इन्फ्राला

## आजपासून शहरात साफसफाई सुरू



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१अमरावती-** अमरावती शहरात कचरा संकलन आणि साफसफाई व्यवस्थापनासाठी राबवण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत फायनान्शियल बिडनंतर सर्वात कमी रकमेच्या (लोएस्ट वन) मुंबईच्या कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीची निविदा मान्य करीत अमरावती मनपा प्रशासनाने संबंधित कंपनीला कार्यारंभआदेश जारी केला.कोणार्क कंपनीकडून आगामीसोमवारपासून अमरावती शहरातील सर्व प्रभागांमधून (विभागांमधून) निघणारा कचरा संकलित करून तो कंपोस्ट डेपोपर्यंत पोहोचवण्याचे काम सुरू केले जाईल.

अमरावती मनपाने शहरातील साफसफाई व्यवस्था अधिक चांगलीकरण्यासाठी सुमारे २३५ कोटी रुपयांच्या एकल व संयुक्त कंत्राट पद्धतीचा अवलंब करण्यासाठी निविदा मागवल्या होत्या. यामध्ये अन्य ३ कंपन्यांसोबत मुंबईच्या कोणार्क इन्फ्रा कंपनीनेही सहभाग घेतला होता. तांत्रिक निविदेत पात्र ठरल्यानंतर, कोणार्क इन्फ्रा कंपनी वित्तीय निविदेत सर्वात कमी बोली लावणारी निविदाधारक ठरली. त्यानुसार, सर्व आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून मनपा प्रशासनाने शनिवारी (ता. २९) सायंकाळी कोणार्क इन्फ्रा कंपनीच्या नावे सफाई कंत्राटाची अंमलबजावणी करण्यासाठी कार्यारंभ आदेश जारी केला. कोणार्क कंपनी आता आगामी सोमवार, १ डिसेंबरपासून अमरावती शहरात साफसफाईचे काम करण्यासोबतच विविध प्रभागांतून निघणारा कचरा संकलित करून तो कंपोस्ट डेपोपर्यंत पोहोचवण्याचे काम सुरू करेल.या संदर्भात माहिती देताना मनपाच्या सूत्रांनी सांगितले की, कोणार्क कंपनीला ठरलेल्या अटींनुसार, शहरातील सर्व प्रभागांतून रोजचा कचरा गोळा करून निर्धारित कंपोस्ट डेपोपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. तसेच, शासन आणि मनपा प्रशासनाच्या निर्देशानुसार, कोणार्क कंपनीला आधुनिक संसाधने आणिनिर्धारित वेळेनुसार साफसफाई करण्यासाठी विशेष दिशानिर्देश देण्यात आलेले आहेत. सूत्रांनुसार, सफाई कामावर लक्ष ठेवण्यासाठी घरोघरी कचरा संकलन, वाहनांचे ट्रॅकिंग आणि तक्रार निवारण व्यवस्था देखील लागू केली जाईल. साफसफाईत हलगर्जीपणा आढळल्यास कंपनीवर दंडात्मक कारवाई केली जाईल आणि कामाचा आढावा नियमितपणे घेतला जाईल. अमरावती शहरात बऱ्याच काळापासून कचरा संकलन व्यवस्था अव्यवस्थित चालू होती, ज्यामुळे नागरिकांमध्ये नाराजी वाढत होती. या पार्श्वभूमीवर, नवीन कंत्राटदाराची नियुक्ती हे एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. कचरा संकलनात व शहराच्या साफसफाईत काय बदल दिसून येतो, ते आगामी काही दिवसांत दिसून येणार आहे.

# भाजपचा नगरपालिका निवडणुकीत १७५ नगराध्यक्ष निवडून येण्याचा अंदाज

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१अमरावती**

राज्यातील २४६ नगरपालिका आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकांची रणधुमाळी आता अंतिम टप्प्यात आली आहे. प्रचार तोफा थंडावण्यास अवघे दोन दिवस उरले असतानाच भाजपने आपल्या अंतर्गत सर्वेक्षणाचे आकडे समोर आणत विरोधकांचे धाबे दणाणून सोडले आहेत. भाजपच्या अंतर्गत सर्व्हेनुसार, राज्यात पक्षाचे तब्बल १७५ नगराध्यक्ष विजयी होणार असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निकालात भाजपच 'मोठा भाऊ' ठरणार, असा विश्वास



पक्षश्रेष्ठींकडून व्यक्त केला जात आहे.

येत्या नगर परिषद आणि नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी २ डिसेंबरला मतदान प्रक्रिया पार पडणार असून, ३ डिसेंबरला निकाल लागणार आहे. या पार्श्वभूमीवर भाजपने प्रचारात मोठी आघाडी घेतली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि रवींद्र चव्हाण यांनी राज्यभरात झंझावाती प्रचार दौरे केले आहेत.

राज्यात नगराध्यक्षपदासाठी २४२ ठिकाणी भाजपचे उमेदवार थेट 'कमळ' चिन्हावर लढत आहेत, तर ४६ ठिकाणी महायुतीचे उमेदवार रिंगणात आहेत. सर्वाधिक जागांवर उमेदवार असल्याने आणि प्रचारातील प्रतिसादावरून भाजपला १७५ हून अधिक नगराध्यक्षपदे मिळण्याचा अंदाज सर्वेक्षणात वर्तवण्यात आला आहे.

**भाजपचा विकासाच्या मुद्द्यावर भर**

भाजपने या निवडणुकीत विकासाचा अजेंडा राबवला आहे. मतदारांना केंद्रातील आणि राज्यातील योजना, तसेच शहरांसाठी वाढीव निधीचे आश्वासन दिले जात आहे. भाजपच्या या आक्रमक प्रचारनीतीमुळे आणि अंतर्गत सर्व्हेच्या आकडेवारीमुळे कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास दुप्पट झाला आहे. आता ३ डिसेंबरला मतपेटीतून येणारा कौल हा भाजपच्या अंतर्गत सर्व्हेनुसार लागतो का? हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

**बिहारसारखा रिझल्ट लागेल, आम्ही २०० जागा जिंकू**

दरम्यान, भाजपचे नेते आणि राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी पक्षाच अंतर्गत सर्व्हे येण्याआधीच आम्ही २०० नगराध्यक्षपदाच्या निवडणुका जिंकणार असल्याचा विश्वास व्यक्त केला होता. महाराष्ट्रात भाजपने २५६ ठिकाणी उमेदवार दिले आहेत. त्यापैकी आम्ही किमान २०० नगराध्यक्षपदाच्या निवडणुका जिंकू. आमच्या सभांना मिळणारा प्रतिसाद हा उत्स्फूर्त आहे, ही धरून आणलेली गर्दी नाही. बिहार विधानसभा आणि नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र विधानसभेच्या निकालासारखेच यश भाजपला या निवडणुकीत मिळेल, असे ते म्हणाले होते.

# अमरावतीत स्क्रब टायफसचे १९ रुग्ण; आरोग्य विभाग सतर्क

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१ अमरावती**

अमरावती जिल्ह्यात स्क्रब टायफसचा धोका पुन्हा वाढू लागला असून, १८ नोव्हेंबरपर्यंत एकूण १९ रुग्णांची नोंद झाली आहे. जिल्हा हिवताप विभागाच्या माहितीनुसार, २०२२ नंतर या आजाराने पुन्हा डोके वर काढले आहे. गत २५ ऑक्टोबर रोजी जगतपूर येथील टिरलिंग पवार (६५) यांचा स्क्रब टायफसमुळे मृत्यू झाला होता. त्यानंतर २८ ऑक्टोबर रोजी त्यांची मुलगीदेखील पॉझिटिव्ह आढळली. सध्या विविध गावांमध्ये वाढत्या रुग्णसंख्येमुळे आरोग्य विभाग सतर्क झाला आहे.

या वर्षीचा पहिला रुग्ण १२ जुलै रोजी वरुड तालुक्यात नोंदविण्यात आला. त्यानंतर अमरावतीत कामासाठी आलेला उत्तर प्रदेशातील एक रुग्ण, नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील जगतपुरी येथील



तीन रुग्ण, तसेच आसेगाव पूर्णा, पुसदा, दारापूर, चौसाळा, वलगाव, विष्णोरा (खेड), खोलापूर, सवलगाव (येसुर्णा), नेरपिंगळाई, लोणी टाकळी, वायगाव (आष्टी) आणि झिल्पी या गावांमध्ये रुग्ण आढळले आहेत. एकूण रुग्णांमध्ये १० महिला व ९ पुरुषांचा समावेश आहे.

सध्या संशयित रुग्णांचे नमुने तपासणीसाठी नागपूरला पाठवले जात असल्याने अहवाल मिळण्यास विलंब होत असल्याचेही आरोग्य विभागाचे म्हणणे आहे. स्क्रब टायफस हा झुडपांमध्ये राहणाऱ्या माइट किड्याच्या चाव्यामुळे होतो. त्यामुळे शेतकरी, मजूर, जंगलातील कामगार यांना विशेष काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**नागरिकांनी घ्यावयाची काळजी**

झाडाझुडपात काम करताना पूर्ण बाह्याचे कपडे वापरावेत. कपडे, अंथरुणावर कीटकनाशक स्प्रे करावा. झुडपांमध्ये काम करून आल्यावर कपडे गरम पाण्यात भिजवून धुवावेत. त्वरित ताप, अंगावर पुरळ किंवा सूज जाणवल्यास आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा.

# राजेश अग्रवाल यांनी स्वीकारला मुख्य सचिव पदाचा पदभार



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१मुंबई**

महाराष्ट्र राज्याचा विकास आणि गौरव वाढीसाठी सातत्याने काम करत राहणार, असे प्रतिपादन राज्याचे नवनियुक्त मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी केले आहे. राज्याचे मावळते मुख्य सचिव राजेशकुमार यांच्याकडून नवनियुक्त मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी रविवारी पदभार स्वीकारला. त्यावेळी ते बोलत होते.

मंत्रालयातील मुख्य सचिवांच्या दालनात झालेल्या या कार्यक्रमाप्रसंगी वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव मनिषा वर्मा, सामान्य प्रशासन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव व्ही. राधा, कृषी विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी, गृह विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव (अ.व.सु) राधिका रस्तोगी, मदत पुनर्वसन व आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या प्रधान सचिव विनिता वैद-सिंगल, ग्राम विकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, मुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव श्रीकर परदेशी, सामान्य प्रशासन विभागाचे सचिव पंकज कुमार, पर्यावरण विभागाच्या सचिव जयश्री भोज, पशुसंवर्धन, दुग्ध विकास व मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव रामास्वामी एन, दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंडे, माहिती तंत्रज्ञान विभागाचे सचिव वीरेंद्र सिंह, मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त अमित सैनी यांच्यासह मुख्य सचिव कार्यालय व अन्य विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# रब्बीत हरभऱ्याचे सर्वाधिक ५६ हजार हेक्टर क्षेत्रात पेरणी पूर्ण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१ अमरावती**

जमिनीत मुबलक आर्द्रता व उबदार वातावरण रब्बी हंगामाच्या पेरणीसाठी पोषक असल्याने जिल्ह्यात सद्यस्थितीत ७७ हजार हेक्टरमध्ये रबीच्या पेरण्या आटोपल्या आहेत. यामध्ये सर्वाधिक ५६ हजार हेक्टर हरभरा तर १८ हजार हेक्टर क्षेत्र गव्हाचे आहे. ही ४९.९१ टक्केवारी आहे. खरीप हंगाम लांबल्याने रब्बीच्या पेरण्या लांबणीवर पडल्या आहे. तरीही डिसेंबर अखेरपर्यंत पेरण्या अंतिम होण्याची शक्यता आहे.कृषी विभागाद्वारे यंदाच्या रब्बी हंगामासाठी १,५४,०१० हेक्टर सरासरी क्षेत्र आहे. त्यातुलनेत गुरुवारपर्यंत ७६,८६९ हेक्टरमध्ये पेरणी आटोपली आहे. यावर्षी खरिपात संततधार पाऊस व अतिवृष्टीने पिकांचे नुकसान झाले तरी जमिनीत पावसाच्या पाण्याचे पुनर्भरण झाल्याने जमिनीची आर्द्रता वाढली.



धरणात देखील १०० टक्के साठा आहे. भूजल स्तरात वाढ झाल्याने विहिरीत ही मुबलक पाणी असल्याने यावर्षी रब्बी हंगामाच्या सिंचनाचा प्रश्न निकाली निघाला आहे. त्यामुळे यंदा किमान २५ ते ३० हजार हेक्टरमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे.अशा परिस्थितीत बीजप्रक्रिया न केल्यास हरभऱ्यावर मर रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. किंबहुना काळीच्या भागातील तूर व हरभऱ्यावर 'मर' रोगाचा अटॅक झाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे शेतक-यांनी दक्षता घ्यावी त बीजप्रक्रिया करण्याचे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

**तालुकानिहाय रबीची पेरणी**

सद्यस्थितीत धारणी तालुक्यात ५९१३ हेक्टर, चिखलदरा ११५९, अमरावती ५५६४, भातकुली ३७२५, नांदगाव खंडेश्वर ८०६१, चांदूर रेल्वे ६१,५२, तिवसा ४१४८, मोशी ४४६२, वरुड ३७८०, दर्यापूर ४०८६, अंजनगाव सुर्जी २७८८, अचलपूर २८९०, चांदूरबाजार ३४१२ व धामणगाव रेल्वे तालुक्यात १६,६३० हेक्टरमध्ये पेरणी आटोपली आहे.

# डिसेंबर २०२५ ला अंतोदय कार्ड धारकांना साखर उपलब्ध होणार

## सौ अलका निलेश पारडे यांच्या पाठपुराव्याला यश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१दर्यापूर**

केंद्र सरकारच्या अनुदानाने महाराष्ट्र सरकार रास्त भाव दुकानात २० रुपये किलो प्रति अंतोदय कार्ड प्रमाणे वाटप करत होते परंतु मागील २ वर्षापासून साखर वाटप शासनाने बंद करण्यात आला होता रास्त भाव दुकानात सर्वसामान्य नागरिक व खूपच गरीब लोकांचे अंतोदय कार्ड असल्याने त्यांना २० रुपये किलो प्रति कार्ड साखर वाटप करावे व ती बंद पडलेली योजना सुरू करावी यासाठी शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या अमरावती महिला



आघाडी जिल्हाप्रमुख सौ अलका निलेश पारडे यांनी ना छगन भुजबळ अन्नपुरवठा मंत्री महाराष्ट्र राज्य यांना जिल्हा पुरवठा अधिकारी अमरावती यांच्या मार्फत निवेदन देण्यात आले होते व त्यांनी या बाबतीत पाठपुरावा चालूच ठेवला होता अखेर शासनामार्फत डिसेंबर २०२५ ला रास्त भाव दुकानात साखर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे त्यासाठी शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या अमरावती महिला आघाडी जिल्हाप्रमुख सौ अलका निलेश पारडे यांनी शासनाचे आभार मानून अभिनंदन केले आहे.

# चांदूरबाजार तालुक्यात २४ हजार शेतकयाच्या खात्यात अनुदान जमा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१चांदूर बाजार**

२०२५ च्या खरीप हंगामात अतिवृष्टी व सततच्या पावसामुळे झालेल्या, पीक नुकसानीला शासनाने शेतकऱ्यांसाठी आर्थिक देण्यासाठी हेक्टरी अनुदान जाहीर केले. निकषानुसार अनुदानासाठी, तालुक्यातील या अंदाजे ३३ हजार शेतकरी पात्र ठरलेत. या पैकी २४ हजार शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर अनुदान राशी २७ नोव्हेंबर पर्यंत जमा झाली आहे.

उर्वरीत नऊ हजार शेतकऱ्यांची अनुदान राशी जमा होण्याची प्रक्रिया सुरू आहे. या नऊ हजार शेतकऱ्यांपैकी पाच हजार शेतकऱ्यांच्या बँक खात्यात, अनुदान जमा होण्याची प्रक्रियासुरू आहे. तर ४ हजार शेतकऱ्यांचेखाते समाईक खाते, बँक चुक, आधारन जुळणे, नावात चुक, नावात बदल इत्यादींमुळे फॉल्टी झाले आहेत. अशा शेतकऱ्यांकडून आवशयक कागदपत्रे व तलाठी अहवाल मागवून, दुरुस्ती करून परत अनुदाना साठी प्रस्तावित यादी पाठविण्याची प्रकीया सुरू आहे. दोन आठवड्यात ही सर्व प्रक्रिया पूर्ण होऊन, शासनाकडून अनुदान प्राप्त होणे सुरू होईल. सध्या शासनाचीडी.बी.टी.प्रणालीसदोष असल्याचे अनुदान जमा होण्यास वेळलागत आहे.

**टीबीटी प्रणाली लवकरच सुरु**

१० नोव्हेंबरपासून बीडीपी प्रणाली प्रकीया काही दिवस बंद होती. सध्याहीप्रणाली सुरू असली तरी, अत्यंत हळूप्रक्रिया सुरू आहे. सध्या तालुक्यातील ७३ टक्के शेतकऱ्यांच्या खात्यावर अनुदान जमा झाले आहे. टीबीटी प्रणाली लवकरचपूर्ववत सुरू होईल. तेव्हा तातडीने शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर अनुदान जमा होण्यास सुरुवात होईल. अशी माहिती सोनल सुर्यवंशी, (तहसीलदार) यांनी दिली.

# जागतिक एड्स दिन जनजागृती फेरी काढून साजरा

## पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ नर्सिंग अमरावतीच्या विद्यार्थ्यांचा उपक्रम



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१अमरावती**

पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ नर्सिंग अमरावती येथे दिनांक ०१ डिसेंबर २०२५ हा जागतिक एड्स दिन जनजागृती फेरी काढून साजरा करण्यात आला. नर्सिंग महाविद्यालयाच्या शेकडो विद्यार्थ्यांनी महाविद्यालय व गजानन टाऊनशीप भागात जनजागृतीच्या घोषणा देत परिसरात एड्स ह्या महाभयंकर रोगा बद्दल जनसामान्यांना माहिती दिली.महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. एस. जी. गवई ह्यांनी विद्यार्थ्यांना कार्यक्रमाचे महत्व सांगून एड्स ह्या महाभयंकर रोगाबद्दल मोलाचे मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमाला जिल्हा रूग्णालयातील जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभागाचे जिल्हा प्रकल्प अधिकारी श्री. अजय साखरे ह्यांनी प्रास्ताविक सादर केले तथा जिल्हा सामान्य रूग्णालयाचे काउंसलर श्री. श्याम वाहाणे ह्यांनी विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती फेरीचा उत्साह निर्माण केला.नर्सिंग महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उस्फूर्त प्रतिसाद देत फेरी यशस्वीरित्या पूर्ण केली. सदर कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य श्री एस. जी. गवई, श्री. कपिल रायबोले, कु. नम्रता ठाकरे, सौ. स्नेहल लकडे, श्री. आशिष ईंगळे, कु. मयूरी गायकवाड, कु. शुभांगी केळझरे, कु. पौर्णिमा पकडे, कु. वैशाली चांभारे, श्री. निखिल गेडेकर, श्री. श्रीकांत अळसपूरे, श्री. शुभम राऊत, श्री. धीरज भागवतकर व सर्व विद्यार्थ्यांनी सहकार्य लाभले.

# नवनीत राणांचा जोरदार पलटवार; अप्रत्यक्ष अजित पवारांवर निशाणा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१ वरुड**

वरुड येथे आयोजित एका जाहिरसभेत माजी खासदार नवनीत राणा यांनी आपल्या पराभवाबाबत आणि राज्यातील सत्तास्थितीविषयी ठळक वक्तव्ये करून राजकीय वातावरण तापवले.



आपल्या अलीकडील निवडणुकीतील पराभवाचा उल्लेख करताना त्यांनी म्हटले की, माझ्या निवडणुकीमध्ये काही मतांचे विभाजन झालं नसतं तर माझा पराभव झाला नसता. यामधून त्यांनी आपल्या विरोधकांनी मतविभाजन घडवून आणल्याचा आरोप अप्रत्यक्षरीत्या उपस्थित केला.यानंतर त्यांनी राज्यातील सत्तेतील निर्णयप्रक्रियेवर भाष्य करत टोला लगावला. कोणी कितीही सांगितलं की मंत्रालयामध्ये तिजोरीची चाबी आमच्याकडे आहे, तर विश्वास ठेवू नका कारण आमचे देवा भाऊ त्यांच्यावर बसलेले आहेत, असे म्हणत त्यांनी अप्रत्यक्षरित्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांना लक्ष्य केले.नवनीत राणा यांच्या या वक्तव्यांमुळे अमरावती तसेच राज्याच्या राजकारणात नवा चर्चेचा विषय निर्माण झाला आहे.

# तडीपारांनाही मतदानाची मुभा पोलिसांची कडक नजर



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१ परतवाडा**

अमरावती जिल्ह्यातील अचलपूर, परतवाडा आणि सरमसपुरा पोलिस स्टेशन हद्दीत तडीपार केलेल्या व्यक्तींनाही आगामी निवडणुकीत मतदानाचा अधिकार बजावता येणार आहे. कायद्यानुसार मतदान हा त्यांचा मूलभूत अधिकार असल्याने त्यावर कोणतीही मर्यादा घालता येत नाही. त्यामुळे तडीपार व्यक्तींना मतदानाच्या दिवशी शहरात प्रवेश करण्यास परवानगी दिली जाणार असून, मतदान आटोपून त्यांना पुन्हा शहराबाहेर जाणे आवश्यक आहे.

पोलिस प्रशासनाने या व्यक्तींवर विशेष लक्ष ठेवण्याची तयारी केली आहे. मतदानाकरिता ते निर्धारित वेळेत आल्याची, मतदान करून योग्यरीत्या बाहेर गेल्याची नोंद ठेवण्यात येणार आहे. कोणताही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी सर्व तीन पोलिस स्टेशनांनी विशेष पथके तैनात करण्याचे नियोजन केले आहे.

# जिल्ह्यात एक नगराध्यक्ष, पाच नगरपरिषदेतील आठ सदस्य निवडणुकीला स्थगिती




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि १अमरावती**

जिल्ह्यातील अंजनगाव सुर्जी येथील नगरपरिषद अध्यक्ष आणि आठ जागांवर सदस्यपदासाठी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी दाखल केलेले अपील २२ नोव्हेंबर २०२५ नंतर निकाली निघाले आहे. त्यामुळे राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सुधारीत निवडणूक कार्यक्रमानुसार मतदान प्रक्रिया पार पडणार आहे.राज्य निवडणूक आयोगाच्या ४ नोव्हेंबर २०२५ च्या पत्रान्वये नगर परिषदांच्या सदस्य व अध्यक्ष पदासाठी सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम जाहीर केला होता. परंतु ज्या नगर परिषदा आणि नगर पंचायतीमध्ये ज्या जागेसाठी अपील दाखल होते, मात्र अपिलाचा निकाल संबंधित जिल्हा न्यायालयाकडून २२ नोव्हेंबर २०२५ नंतर म्हणजेच २३ नोव्हेंबर २०२५ किंवा त्यानंतर देण्यात आला आहे, अशा नगर परिषद व नगर पंचायतीच्या सदस्य पदाच्या त्या जागेच्या निवडणुका ४ नोव्हेंबर २०२५ रोजीच्या निवडणूक कार्यक्रमानुसार घेण्यात येऊ नयेत. तसेच अशा प्रकरणात अध्यक्ष पदाचा समावेश असल्यास त्या संपूर्ण नगर परिषदेची निवडणूक स्थगित करण्याबाबत राज्य निवडणूक आयोगाने २९ नोव्हेंबर २०२५ रोजी आदेशान्वये निर्देशित केले आहे.सदर सूचनेनुसार अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर नगरपरिषदेतील जागा क्रमांक २ अ, अचलपुर नगरपरिषदेच्या जागा क्र. १० अ, जागा क्र. १९ ब, वरुड नगरपरिषदेच्या जागा क्र. १२ अ, अंजनगाव (सुर्जी) नगरपरिषदेच्या जागा क्र. ६ अ, जागा क्र. ७ ब, धारणी नगरपंचायतच्या प्रभाग क्र. १४, प्रभाग क्र. १६ आणि अंजनगाव (सुर्जी) नगरपरिषदेच्या अध्यक्ष पदासाठी घेण्यात येणाऱ्या निवडणुकांना स्थगिती देण्यात आली आहे. येथील निवडणूक प्रक्रिया सुधारित निवडणूक कार्यक्रमानुसार घेण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी आशिष यांनी कळविले आहे.

# निवडणुका काही वार्डात अचानक स्थगित करणे हा लोकशाहीला धक्का देणारा निर्णय; यशोमती ठाकुर यांचा हल्लाबोल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सुरू आहेत. नगरपालिका, नगर परिषदांच्या निवडणुका सुरू आहेत. राज्यभरात प्रचारसभा सुरू आहेत. दरम्यान, आता राज्य निवडणूक आयोगाने काही निवडणुका पुढे ढकलल्या आहेत. न्यायालयातील याचिकांमुळे या निवडणुका पुढे ढकलल्या असल्याचे सांगण्यात येत आहे. दरम्यान, आता काँग्रेस नेत्या यशोमती ठाकुर यांनी या निर्णयावरून



हल्लाबोल केला आहे.

राज्यातील काही नगरपंचायत व नगरपालिका क्षेत्रांतील निवडणुका अचानक काही वार्डमध्ये न घेण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला आहे. हा निर्णय पूर्णतः मनमानी असून निर्वाचन आयोग आणि सरकार यांची मिळून बनवलेली चुकीची भूमिका असल्याचे स्पष्ट दिसत असल्याचे ठाकुर यांनी म्हटले आहे.

या निर्णयामुळे संबंधित क्षेत्रातील नागरिकांचा लोकशाही हक्क बाधित होत असून, कोणताही पुरेसा कारणमीमांसा न देता निवडणूक स्थगित करणे हा लोकशाहीला धक्का देणारा प्रकार आहे, अशी टीका ठाकुर यांनी केली.

कोर्टाच्या स्पष्ट निर्देशांनुसार निवडणुका नियमित पद्धतीने घेणे बंधनकारक आहे. निवडणुका टाळून जनतेला प्रतिनिधी निवडण्यापासून दूर ठेवणे हा अलोकशाही आणि अन्याय निर्णय आहे. तात्काळ कोर्टाच्या आदेशानुसार निवडणुकीची प्रक्रिया राबवावी, अशी मागणी ठाकुर यांनी केली.यशोमती ठाकुर म्हणाल्या, अशा निर्णयांमुळे प्रशासनावरचा जनतेचा विश्वास कमी होत असून, सरकार व निर्वाचन आयोगाने ताबडतोब हा निर्णय मागे घेत निवडणूक प्रक्रिया सुरळीत सुरू करावी, अशी मागणी यशोमती ठाकुर यांनी केली.

# धनशक्ती विरोधात जनशक्तीचा होतोय संघर्ष



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

निवडणूक म्हटली की, पैसा केंद्रस्थानी मानला जातो. पैशाने राजकारणाची खेळी खेळण्यात काही मातब्बर तरबेज असतात. दरवेळेस निवडणूक पैशाच्या जोरावर जिंकण्यात येते, असा मतदारांमध्ये सूर आहे. मात्र, यावेळेस राजकीय वातावरण बदलल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे अगदी जवळ येऊन ठेपलेल्या नगर परिषद निवडणुकीत धनशक्तीच्या विरोधात जनशक्तीचा विजय होणार काय, अशी चर्चा मतदारांमध्ये सुरू असेल्याचे दिसून येत आहे.

कोणतीही लहान-मोठी निवडणूक ही सर्वसाधारण व्यक्तीच्या आवाक्याबाहेर आहे, असा समज सध्या नागरिकांत आहे. पैशाच्या बळावर निवडणूक लढली जाते व जिंकली जाते, असाही समज आहे. मागील निवडणुकांमध्ये अनेकांनी पैशाच्या बळावर निवडणूक जिंकली असल्याचे दिसून आले. सध्या अनेक धनदांडगे निवडणुकीत उभे असून धनशक्तीच्या जोरावर मतदारांना विविध प्रलोभने दाखवून निवडणुकीत जिंकण्याचा प्रयत्न केला जाऊ शकतो. अनेक प्रभागांत सध्या पार्चा रंगल्या असून मतदारांना आपल्याकडे वळविण्याचा आटोकाटप्रयत्न करण्यात येत आहे. सध्याची प्रत्येक प्रभागात परिस्थिती बघता यावेळी चित्र पालटणार असल्याचे दिसून येते. धनशक्तीला न जुमानता सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या, लोकाभिमुख कार्य करणाऱ्या उमेदवाराला मतदार मतदान करून निवडून देतील काय, हाही प्रश्नच आहे. त्यामुळे नगर परिषद निवडणुकीत धनशक्तीच्या विरोधात जनशक्तीचा विजय होणार काय ? चौकाचौकात, गल्लीबोळात, पारावर याच चर्चा सुरू असून निवडणुकीच्या मतदानाच्या दिवशी मतदार कुणाला पसंती देतात. हे स्पष्ट होणार आहे.

# बिबट्याचा वावर- शेतकऱ्यांच्या समस्यांना घाला आवर

## शेतकऱ्यांना ओलीतासाठी दिवसा लाईन द्या- तालुका काँग्रेस आक्रमक



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १ तिवसा**

तिवसा तालुक्यातील शेंदुर्जना बाजार, वाठोडा, भांबोरा तथा बनसापुर या शेत शिवारामध्ये व गावालगत बिबट्याचा वावर असून अनेक पाळीव प्राण्यांवर सुद्धा त्याचा हल्ला नुकताच झालेला आहे.या भागातील शेतकरी व नागरिक भयभीत असून शेतीचे कामे करण्यासंदर्भात त्यांना अडचण निर्माण होत आहे त्यामुळे त्यांच्या शेती पिकाचे नुकसान होऊ शकते.बरेच शेतकरी व शेतमजूर शेतात जायला घाबरत असल्याने शेतीची कामे सुद्धा प्रभावित झाली आहेत. गेल्या वीस ते पंचवीस दिवसापासून या बिबट्याचा वावर या भागात आहे. या संदर्भात वनविभागाने पुष्टी केली असून पिंजरे, ट्रॅप कॅमेरे, व त्यांची गस्त सुरू आहे, याबाबत वनविभागाच्या अधिकाऱ्यांची गावकऱ्यांसमवेत रविवार रोजी बैठक सुद्धा शेंदुर्जना बाजार येथे पार पडली.आज याबाबत दिवस आता लोक काँग्रेस कमिटीच्या वतीने व शेतकऱ्यांच्या वतीने तहसीलदार तिवसा व वीज वितरण कंपनीचे उपअभियंता,व वन विभागाला या संदर्भात निवेदन सादर करून खालील मागण्या करण्यात आला. वीज वितरण कंपनी मार्फत शेतीच्या ओलितासाठी जो विद्युत पुरवठा केला जातो तो या गावांमध्ये तसेच तिवसा तालुक्यामध्ये दिवसा करण्यात यावा, सकाळचे भारनियमन न ठेवता सकाळी विद्युत पुरवठा शेतकऱ्यांना करण्यात यावा.तसेच या भागातील शेतकऱ्यांच्या नुकसानीच्या संदर्भात महसूल व वनविभागाने संयुक्त शेतकऱ्यांच्या अर्जाची नोंद घ्यावी.तसेच युद्ध पातळीवर प्रयत्न करून नागरिकांची व शेतकऱ्यांमध्ये जी दहशत पसरली आहे त्या संदर्भात प्रशासनाकडून व वनविभागाकडून तातडीच्या उपाययोजना राबविण्यात याव्या या आग्रहि मागण्या करण्यात आल्या अन्यथा आंदोलन करण्याचा ईशारा देण्यात आला.

**सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक**
**जाहिरात आणि बातम्यांसाठी**
**संपर्क करा ८६०५९४८८५३**

# प्रचारावर भर कमी; मात्र रात्री पार्ट्यांना आले उधाण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

नगरपरिषद निवडणुकीची रणधुमाळी सुरू असताना एका नव्या फैशनची औरदार चर्चा अशी की, उमेदवारांचा प्रचार कमी, पण पार्टी जास्ता सुरु आहे मतदारसंघात घराघरात भेटी, समस्या ऐकणे, माणसात मिसळणे, यापेक्षाही उमेदवार सेल्फी पार्टी व रात्री उशिरापर्यंत तगडी मेजवानी यावरच जास्त फोकस करत असल्याचे नागरिक बोलत आहेत.काही उमेदवारांनी तर स्वतन्च प्रचाराचा खर्च कमी करून पार्टीच्या 'लिस्ट'वर जास्त बजेट टाकले असल्याची चर्चा आहे. बॅनर, पोस्टर, सोशल मीडियावरील व्हिडीओ यावर जास्त भर असल्याचे दिसून येत आहे. रस्ते, पाणी, सांडपाणी, कचरा व्यवस्थापन आदी मूळ प्रश्न विचारले की, काही उमेदवार आश्वासन देत आहेत. काही उमेदवार मी उच्चशिक्षित आहे. त्यामुळे हे काम माझेच आहे, असेही मतदारांना सांगत आहेत.

# नादुरुस्त झालेले ट्रान्सफार्मर तातडीने दुरुस्त करण्याची ग्रामस्थांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १ शिरजगाव मोझरी**

मालधूर डीपी धानोरा डीपी, पालवाडी डीपी, तिवसा येथील लांडगे डीपी, ढवळे डीपी, शेवटी. बाजार येथील व इतर नादुरुस्त झालेले ट्रान्सफार्मर तातडीने दुरुस्त करावे, यासाठी सुद्धा पाठपुरावा करण्यात आला.

यावेळी निवेदन, व चर्चा करताना तालुका अध्यक्ष वैभव स. वानखडे, सुरेशराव मेटकर, लुकेश केने, योगेश वानखडे, अमर वानखडे, सुनिल बाखडे, विशाल सावरकर, चंद्रशेखर ठाकूर, विवेक देशमूख, वैभव ढवळे, विजय कुरळकर, प्रशांत कांबळे, किसन मुंदाने, विश्वजीत बाखडे, गजानन भोंबे, नरेंद्र विघ्ने, हरिभाऊ गजबे, पांडुरंग खेडकर, सुधीर बोके, स्वप्नील तुरकाने, प्रमोद वानखडे, नितिन मेहकरे, एजाज खान, प्रफुल वानखडे, अमोल पन्नासे, वैभव काकडे, अनिकेत बादशे,अनिकेत तालन, अक्षय पवार, अनंत शेंद्रे, गौरव चौधरी, आकाश मकेश्वर, आदी पदाधिकारी, शेतकरी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# उद्याला होणाऱ्या मतदाना करीता ११७ पोलिस अधिकाऱ्यांसह २३५३ पोलिस बंदोबस्तावर

## एसपींच्या नेतृत्वात ग्रामीण पोलिसांची कडक सुरक्षाव्यवस्था



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

उद्याला होऊ घातलेल्या नगर परिषदआणि नगर पंचायत निवडणुकी दरम्यान कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी ग्रामीण पोलिसांनी पूर्वनियोजित सुरक्षा व्यवस्थेचे नियोजन केले आहे. अतिरिक्त पोलिस बंदोबस्तासह, निवडणुकी दरम्यान ११७ पोलिस अधिकाऱ्यांसह २३५३ पोलिस बंदोबस्तावर तैनात केले जातील. या बंदोबस्तासाठी विविध पथके तयार करण्यात आली आहे. सर्व पथकांना नियुक्त करण्यात आले असून आवश्यक दिशानिर्देश देण्यात आले आहे.



राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार, २ डिसेंबर २०२५ रोजी मतदान होणार आहे आणि ३ डिसेंबर २०२५ रोजी मतमोजणी होणार आहे. अमरावती ग्रामीण पोलिस क्षेत्रातील धामणगाव रेल्वे, चांदूर रेल्वे, चांदूर बाजार, अंजनगाव, दर्यापूर, अचलपूर, मोर्शी, वरुडचिखलदरा आणि शेंदुरजना घाट या एकूण १० नगरपरिषदांमध्ये आणि धारणी आणि नांदगाव खंडेश्वर या दोन नगरपंचायतींमध्ये महापौर आणि सदस्य पदासाठी निवडणुका होत आहेत.

निवडणुकीदरम्यान ग्रामीण भागात कायदा आणि सुव्यवस्थाराखण्यासाठी अमरावती ग्रामीण पोलिसांनी कडक सुरक्षा व्यवस्था तैनात केली आहे. सुरक्षेसाठी तीन दंगल नियंत्रण पथके, एक जलद प्रतिसाद पथक, एक कंपनी आणि राज्य राखीव पोलिस दलाच्या दोन तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत. याशिवाय,२७एसएसटी, २२ एफएसटी, १६ व्हीएसटी आणि २० सेक्टर पेट्रोलिग पथके तैनात करण्यात आली आहेत.

**बूथ सेंटर कडक सुरक्षेत**

मतदान केंद्र सुरक्षेसाठी विशेष व्यवस्थेचा भाग म्हणून, ग्रामीण पोलिसांनी सहा उपविभागीय पोलीस अधिकारी, ११७ पोलीस अधिकारी, १,४५३ पोलीस अधिकारी आणि ९०० गृहरक्षक तैनात केले आहेत. सर्व मतदान केंद्रे आणि मतमोजणी केंद्रे पोलिसांच्या कडक सुरक्षा व्यवस्था अंतर्गत असतील.

**कायदाचे उल्लंघन केल्यास**

मतदान आणि मतमोजणी प्रक्रियेदरम्यान कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व उपाययोजना करण्यात आल्या आहेत. निवडणुकीदरम्यान कोणीही कायदा हातात घेतल्याचे आढळल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई आणि खटला चालवला जाईल, असा इशारा अमरावती ग्रामीण पोलीस प्रशासनाने दिला आहे.

# जागते रहो..! आजची रात्र सर्वांसाठीच वैऱ्याची

## विशेष पथक तैनात, निवडणूक आयोगाची कडक भूमिका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

नगरपरिषदेत निवडणूक मतदानाआधीच राजकीय तापमान चांगलेच चढले आहे. आज सोमवार हा प्रचाराचा शेवटचा दिवस असल्याने रविवारी शहरात दिवसभर प्रचंड हालचाल पाहायला मिळाली. रविवारी सर्वच उमेदवारांनी रॅली आणि घरपोच जनसंपर्कातून जोरदार शक्तिप्रदर्शन केले. शहरातील रस्त्यांवर अक्षरशः गर्दीची लाट उसळली होती.

आज सोमवारी रात्री १० वाजेपर्यंत यावेळीस प्रचार करता येणार आहे. यामुळे धड़ाकेबाज प्रचार येथे दिवसभर होणार आहे. आपल्या पक्षाला अधिक यश मिळावे याकरिता सर्वच राजकीय पक्षाचे नेते हे पडद्यामामागून हालचाली करीत असल्याचे दिसून येत आहे. अधिकृत उमेदवाराला फटका बसू नये याची काळजी घेतली जात असल्याचे दिसते.




**संवेदनशील क्षेत्रामध्ये पोलिसांचा विशेष वॉच**

जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर फिरते पथक कार्यरत असले तरी निवडणूक आयोगाने येथील निवडणुकीचे संवेदनशील स्वरूप लक्षात घेऊन विशेष पथक तैनात केले आहे. गेल्या काही दिवसांत रोख रकम व गिफ्टवाटपबाबत झालेल्या तक्रारींनंतर आयोगाने या निवडणुकीकडे अधिकच करडी नजर ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

**पोलिस अलर्ट मोडमध्ये**

आयोगाच्या आदेशानंतर पोलिस यंत्रणाही पूर्णपणे सज्ज झाली आहे. मतदानापूर्वी कोणताही तणाव निर्माण होऊ नये यासाठी अतिरिक्त पोलिस दल तैनात करण्यात आले आहे.

# आमदार रवी राणा यांच्या नेतृत्वाखाली कमलची कमळला साथ

## धारणीत भाजपला अपक्ष उमेदवाराचे जाहीर पाठिंबा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१ धारणी**

आज धारणी येथील नगरपंचायत अध्यक्ष पदाचे अपक्ष उमेदवार कमलसिंग बैस ठाकूर यांनी बीजेपी नगरपंचायत अध्यक्ष उमेदवार सुनील श्यामलालजी चौथमल याना मा.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब ,मा. पालक मंत्री चंद्रशेखर बावणकुळे माजी खासदार सौ नवनीत रवी राणा .आमदार रवी राणा यांच्या शब्दाला मान ठेऊन



धारणी शहराच्या विकासा साठी बिन शर्त जाहीर पाठिंबा दिला, यामुळे शहरात भाजपा आघाडीवर असल्याचे दिसून येत आहे.



आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत